Required Teacher
TUKARAM RAMA PATIL PUBLIC SCHOOL
At- Valap Village. Tal- Panvel, Dist Raigad.
Standard 3rd and 4th. All Subject
Qualification: H.S.C. Ded. With fluency in Spoken English.
Prefered by location: Near by Panvel New Panvel, Taloja.
Contact - 8879498842.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ३४३
www.ramprahar.com
रविवार, ३० जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग
कर्जतमध्ये भाजपकडून शेतकऱ्यांना खताचे वाटप/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
भारतीय महिला क्रिकेट संघाने रचला इतिहास/८

# ज्येष्ठांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन घडविण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि. २९) विधानसभेत केली. या योजनेसाठी धोरण आणि नियमावली तयार करून ज्येष्ठांना शासनाच्या माध्यमातून तीर्थस्थळांच्या दर्शनासाठी नेण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले.

या संदर्भात विधानसभा सदस्य प्रताप सरनाईक यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, आमचे सरकार सर्वसामान्यांचे असून काल मांडण्यात आलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पामध्ये शेतकरी, कष्टकरी, वारकरी, कामगार, महिला, युवा यांच्यासाठी विविध तरतुदी केल्या आहेत.



आपला महाराष्ट्र संतांची भूमी असून दरवर्षी अनेक जण तीर्थस्थळांना भेटी देतात. ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन सुलभपणे होण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वंकष धोरण तयार करून त्याची नियमावली केली जाईल. त्या अंतर्गत आवर्तन पद्धतीने, ऑनलाईन अर्ज मागवून ही योजना राबविण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या वेळी झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री राम कदम, प्रकाश सुर्वे, देवयानी फरांदे, मनिषा चौधरी आदी सदस्यांनी भाग घेतला.

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना लाभ घेता येणार आहे. याचे तिकीट दर किती असणार? मोफत असणार की त्यात शुल्क माफी असणार? या योजनेंतर्गत कोणत्या देवस्थानांचा समावेश असणार? याचे नियोजन कसे होणार? यामुळे राज्याच्या तिजोरीवर किती भार पडणार? हे सर्व लवकरच स्पष्ट होणार आहे.

### भाविकांसाठी पर्वणी

पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात महिला, शेतकरी, विद्यार्थ्यांसाठी विविध योजना आणण्यात आल्या आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. लाडकी बहीण, विद्यार्थी शिष्यवृत्ती अशा अनेक योजनांची घोषणा शुक्रवारी वित्तमंत्री अजित पवार यांनी केली. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना जाहीर करीत राज्यातील भाविकांसाठी आनंदाची बातमी दिली. अनेक ज्येष्ठ नागरिकांना इच्छा असून पैशांमुळे देवदर्शन करता येत नाही. ज्यांना परवडते ते सहकुटुंब देवदर्शनाला जातात, पण ज्यांना नाही परवडत त्यांची इच्छा अपूर्णच राहते. या भाविकांना नव्या योजनेमुळे तीर्थयात्रा करता येणार आहे.



**ब्रिजटाऊन : भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० वर्ल्डकप फायनलमध्ये प्रथम फलंदाजी करताना ७ बाद १७६ धावा केल्या. सुरुवातीच्या पडझडीनंतर विराट कोहली आणि अक्षर पटेल यांनी संघाचा डाव सावरला. यादरम्यान विराटने अर्धशतक केले.**

# आम्ही खोटी आश्वासने देऊन मत मागणार नाही –आशिष शेलार

**अलिबाग : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी खोटे नरेटीव्ह रचले. आम्ही कोणतीही खोटी आश्वासने देऊन मत मागणार नाही. येत्या विधानसभा निवडणुकीत महायुती यशस्वी होईल, असा विश्वास भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतील कामगिरीचा आढावा घेऊन दक्षिण रायगड जिल्ह्यातील प्रमुख भाजप कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यासाठी अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील साई इन हॉटेलमध्ये शनिवारी (दि. २९) बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत आमदार आशिष शेलार बोलत होते.



या वेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, ज्येष्ठ नेते सतिश धारप, सतिश काळशेकर, जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील आदी उपस्थित होते.

राज्याचा अर्थसंकल्प शुक्रवारी सादर झाला. या अर्थसंकल्पात जी आश्वासने देण्यात आली आहेत त्याचा येत्या काळात फायदा होणार आहे. पुढील सरकार हे महायुतीचेच असेल. त्यामुळे ही आश्वासने पूर्ण केली जातील, असे आमदार शेलार म्हणाले.

रायगड जिल्ह्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे रायगड लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे निवडून आले. भाजप कार्यकर्त्यांचे परिश्रम फळाला आले, असे आमदार शेलार म्हणाले.

कोविडमुळे जगभरात सत्ताधाऱ्यांविरोधात वातावरण होते. जगभरातील अनेक सत्ता बदलल्या, परंतु भारतीय जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास दाखवला. त्यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविले. हा त्यांच्यावर जनतेने दाखवलेला विश्वास आहे. आता आपल्याला विधानसभेच्या कामाला लागायचे आहे. जास्तीत जास्त मतदार नोंदवा, असे आवाहन शेलार यांनी कार्यकर्त्यांना केले.

# 'नीट' परीक्षेसंदर्भातील सूचनांचा सकारात्मक विचार –अजित पवार



**मुंबई : प्रतिनिधी**

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या 'नीट' परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराची केंद्र आणि राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून वेगवेगळ्या यंत्रणांकडून कारवाई सुरू करण्यात आली आहे. दोषींना अटक करण्यात आली आहे. भविष्यात असे गैरप्रकार टाळण्यासाठी केंद्र सरकारने अध्यादेश जारी केला आहे. त्याद्वारे दोषींवर कठोर कारवाईसह मोठ्या आर्थिक दंडाची तरतूद केली आहे. विद्यार्थ्यांचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी राज्य शासन बांधिल असून या संदर्भात विरोधी पक्षांनी सूचविलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार केला जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी (दि. २९) विधानसभेत दिली. (पान २ वर..)

## निवडक

### लडाखमध्ये नदी ओलांडताना लष्कराचे पाच जवान शहीद

**लेह** : पूर्व लडाखमधील दौलत बेग ओल्डी भागात शुक्रवारी (दि. २८) रणगाड्याद्वारे नदी ओलांडत असताना अचानक पाणीपातळी वाढल्याने भारतीय लष्कराचे पाच जवान वाहून गेले. हा भाग चीनच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ आहे. पाचही मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेवर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दुःख व्यक्त केले आहे.

### जेडीयूच्या कार्याध्यक्षपदी संजय कुमार झा यांची निवड

**नवी दिल्ली** : जनता दल युनायटेड (जेडीयू) पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक शनिवारी (दि. २९) राजधानी दिल्लीत झाली. या बैठकीत पक्षाचे राज्यसभा खासदार संजय कुमार झा यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. बैठकीत पक्षाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी संजय कुमार झा यांना कार्याध्यक्ष करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर जेडीयूच्या कार्याध्यक्षपदी संजय कुमार झा यांची निवड करण्यात आली.

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान

## विठूनामाच्या गजराने आळंदी नगरी दुमदुमली



**आळंदी : प्रतिनिधी**

पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे शनिवारी (दि. २९) आळंदीमधून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाले. या पालखीमध्ये हजारो वारकरी सहभागी झाले आहेत. त्यांनी प्रस्थान सोहळ्यावेळी विठूनामाचा गजर केला.

आळंदीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी प्रस्थान सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात रंगला. माऊलींच्या पालखीचे हे १९३वे वर्ष आहे. पालखी सोहळ्यासाठी आळंदी सजली होती. इंद्रायणी काठावर लाखो वैष्णवांचा मेळा जमला होता.

पालखी सोहळ्याच्या प्रस्थानासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही उपस्थित होते. या वेळी त्यांनी पालखीचे दर्शन घेतले तसेच वारकऱ्यांशी संवाद साधला.

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

# सात जणांचा जागीच मृत्यू, तिघे गंभीर

**जालना : प्रतिनिधी**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर दोन कारमध्ये झालेल्या भीषण अपघातात सात जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात जालन्याजवळील कडवंची गावानजीक शुक्रवारी (दि. २८) रात्री ११च्या सुमारास घडला. जखमींना तातडीने प्रथम जालन्याच्या जिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढे छत्रपती संभाजीनगरला हलवण्यात आले आहे.




इर्टिगा कार (एमएच ४७-बीपी ५४७८) नागपूरहून मुंबईकडे जात होती. या कारमधून मधून सहा जण प्रवास करीत होते, तर स्विफ्ट डिझायर कारमध्ये (एमएच १२-एमएफ १८५६) एकूण चार प्रवासी होते. स्विफ्ट कार डिझेल भरून विरुद्ध दिशेने सिंदखेडराजाकडे जात असताना इर्टिगा कारला समोरासमोर धडकून अपघात झाला. या अपघाताची माहिती मिळताच समृद्धी महामार्ग पोलीस आणि जालना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या सहाय्याने बचावकार्य करीत दोन्ही कार महामार्गाच्या बाजूला घेऊन रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

अपघातामध्ये फैजल शकील मन्सुरी, फय्याज मन्सुरी, अल्थ मेस मन्सुरी (सर्व रा. मालाड पूर्व, मुंबई), लक्ष्मण मिसाळ, संदीप बुधवंत, विलास कायंदे यांचा जागीच मृत्यू झाला. एकाची ओळख अजून पटली नाही. त्याचप्रमाणे दोन्ही कारमधील १० ते १२ प्रवासी जखमी झाले असून त्यापैकी चार प्रवाशांना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यातील तीन रुग्णांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले, तर एकावर जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# श्रीवर्धनच्या विरेश वाणींनी साकारलेले चित्र महाराष्ट्राच्या राजभवनात झळकले

**श्रीवर्धन : प्रतिनिधी, बातमीदार**

श्रीवर्धन येथील चित्रकार व रांगोळी कलाकार वीरेश वाणी यांनी काही इतिहास अभ्यासक मित्रांची मदत घेऊन शिवराज्याभिषेक सोहळ्याचे समोरून चित्र रेखाटले आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांना वाणी यांनी हे चित्र भेट दिले.



शिवराज्याभिषेक सोहळ्याचे विशेष चित्र तयार करण्यासाठी वीरेश वाणी यांनी जवळजवळ तीन वर्ष मेहनत घेतली. कलाप्रेमी असलेले राज्यपाल रमेश बैस यांनी हे चित्र राजभवनात लावण्याच्या सूचना तेथील कर्मचाऱ्यांना केल्यानंतर चित्र राजभवनात झळकले.

वाणी यांना लहानपणापासूनच चित्र काढण्याची आणि रांगोळ्या रेखाटण्याची आवड होती. त्यांनी अनेक रांगोळी स्पर्धांमध्ये दिग्गज नेत्यांची व खेळाडूंची रांगोळी काढून विविध प्रकारची बक्षिसे मिळवली आहेत. ते सध्या उल्हासनगर येथे वास्तव्यास असून सणासुदीला मूळ गावी श्रीवर्धन येथे येत असतात. त्यांचे चित्र राजभवनात झळकल्यामुळे विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच मित्रपरिवाराने अभिनंदन केले.

# कुंडलिक खांडेंची पक्षातून हकालपट्टी

**बीड** : शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यांची कथित ऑडिओ क्लिप गेल्या काही दिवसांपासून व्हायरल होत होती. अखेर त्यांच्यावर कारवाई झाली आहे.



कुंडलिक खांडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शिवराज बांगर यांची ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. यात खांडे यांनी विरोधी उमेदवार व आताचे खासदार बजरंग सोनवणे यांना लोकसभा निवडणुकीत मदत केल्याचा संवाद आहे. शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. या प्रकरणात कुंडलिक खांडे आरोपी होते. कोर्टाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली, तर पक्षाने त्यांची हकालपट्टी केली.


# माळशेजचे सौंदर्य आणखी खुलणार

## काचेच्या स्काय वॉक प्रकल्पाला शासनाची मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे पावसाळी अधिवेशन सध्या सुरू आहे. विधानभवनात शुक्रवारी राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. या वेळी राज्यासाठी अनेक घोषणा करण्यात आल्या. त्याचबरोबर पायाभूत सुविधांसाठीही काही निधी तसेच प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. पर्यटनाच्या दृष्टीनेही अर्थसंकल्पात काही तरतूदी करण्यात आल्या आहेत. ठाणे जिल्ह्यात असलेल्या माळशेज घाटाबाबतही घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यातील माळशेज घाटात पावसाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी होते. याच माळशेज घाटात आता पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी काचेची व्ह्यूविंग गॅलरी अर्थात काचेचा स्काय वॉक प्रकल्प उभारण्यात येणार आहे. शुक्रवारी सादर झालेल्या अर्थसंकल्पात या प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे. माळशेज घाटात हा काचेचा स्काय वॉक उभारण्यासाठी आता चालना मिळणार असून त्यामुळे पर्यटकांसाठी पर्वणी ठरणार आहे. भारतातील हा पहिलाच प्रकल्प ठरणार आहे.



माळशेज घाटात चीन देशातील काचेच्या व्ह्यूविंग गॅलरीप्रमाणेच भव्य गॅलरी उभारण्याचा प्रस्ताव आमदार किसन कथोरे यांनी सादर केला होता. राज्यात पर्यटकांच्या वाढीसाठी तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी माळशेज घाटात हा प्रकल्प फायदेशीर ठरणार आहे. भारतातील हा पहिला प्रकल्प असेल. त्यामुळे मोठ्या संख्येने पर्यटक माळशेज घाटाकडे आकर्षित होतील. त्याचबरोबर स्थानिकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होणार आहेत.

### भारतातील पहिलाच प्रयोग

माळशेज घाटात देशातील पहिला पारदर्शक पूल म्हणजेच व्ह्यूविंग गॅलरी बांधण्यात येणार आहे. माळशेज घाटातील ७०० मीटर खोल दरीवर हा प्रकल्प बांधण्यात येणार आहे. १८ मीटर लांबीचा यू-शेप वॉक वे बांधण्याची प्रशासनाची योजना आहे. इतकेच नव्हे तर ही व्ह्यूविंग गॅलरी पारदर्शी म्हणजेच काचेची असल्याने पर्यटकांना खोल दरीचा नजारा अनुभवता येणार आहे तसेच पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या निसर्गसौंदर्याचा आनंददेखील घेता येणार आहे.

# कर्जतमध्ये भाजपकडून ५५० शेतकऱ्यांना खताचे मोफत वाटप

## किसान मोर्चाच्या सुनील गोगटेंच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**कर्जत : प्रतिनिधी**

किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांच्या वाढदिवसानिमित्त कर्जत तालुक्यातील ५५० शेतकऱ्यांना मोफत खतांचे वाटप करण्यात आले.

रॉयल गार्डनमध्ये विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश तात्या भेगडे, रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष अविनाश कोळी, माजी आमदार सुरेश लाड, जिल्हा वसंत भोईर, जिल्हा चिटणीस रमेश मुंडे, किसान मोर्चा सरचिटणीस मनोज कासवा, विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, माजी तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, किसान मोर्चाचे रायगड जिल्हा अध्यक्ष अतुलजी बडगुजर सरचिटणीस जनार्दन म्हसकर, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, पंचायत समिती माजी सदस्य नरेश मसणे, तालुका सरचिटणीस वसंत महाडिक, कर्जत शहर अध्यक्ष विजय जिनगरे, सरचिटणीस सूर्यकांत गुप्ता, खोपोली शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, विस्तारक हेमंत नांदे आदी उपस्थित होते.

अतुल बडगुजर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मिनेश मसणे यांनी प्रास्ताविक केले. माजी आमदार सुरेश लाड गोगटे विविध समस्याची जाण असलेला कार्यकर्ता असून पेण को ऑप अर्बन बँक, कोंढाणे धरण, भीमाशंकर घाट रस्ता असेल अश्या विविध समस्यांवर पाठपुरावा योग्य पद्धतीने करत आहेत, असे सांगितले. अविनाश कोळी यांनी सुनील 'गोगटे यांचा राजकीय प्रवास कार्यकर्ता , नगरसेवक ते प्रदेश उपाध्यक्ष असा आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देत बहुसंख्य शेतकरी आपल्या सोबत आणले. गोगटे हे अष्टपैलु व्यक्तिमत्व आहे, असे स्पष्ट केले.

गणेश भेगडे यांनी, गोगटे सामाजिक राजकीय जीवनात अतिशय चांगले काम करात आहेत. शेतकऱ्यांचे विविध प्रश्न ते मार्गी लावत असतात मग ते किसान सन्मान योजना असो मागेल त्याला शेततळे असो किंवा पिक कर्ज असो त्यांनी हजारो शेतकऱ्यांना लाभ मिळवून दिला. पक्षाने दिलेला ग्राम परिक्रमा कार्यक्रम गावोगावी जाउन संपूर्ण महाराष्ट्रत रायगड जिल्हा टीमनी पहिला क्रमांक मिळवला कर्जत खालापुर तालुक्यातील सर्व वाहन धारकाना शेडुंग टोल मधे सूट मिळवून दिली. शेतकरी, कष्टकरी, सर्व सामान्य जनतेच्या समस्या वर आक्रमक आंदोलने करून त्यांना न्याय मिळवून दिला, असे सांगितले. रमेश मुंढे, वसंत भोईर यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन जनार्दन म्हसकर यांनी केले.

सूर्यकांत देशमुख,किसान मोर्चा तालुका अध्यक्ष शिरीष कदम, बळवंत घुमरे, सोशल मीडिया कोकण प्रमुख गायत्री परांजपे, महिला मोर्चा उपाध्यक्ष बिनीता घुमरे, तालुका सरचिटणीस राधा बहुतुले, तालुका उपाध्यक्ष प्रीति तिवारी, खोपोली महिला अध्यक्ष अत्रे, दर्शना बोराडे, कल्पना दास्ताने, प्रमोद पाटिल, मारुती जगताप, स्नेहा गोगटे, सर्वेश गोगटे आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबद्दल महिलांकडून सरकारचे आभार





**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या अर्थसंकल्पात महिला-भगिनींसाठी अनेक निर्णय घेऊन त्यांना दिलासा दिल्याबद्दल विविध क्षेत्रातील महिला- भगिनींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ओवाळून राखी बांधत त्यांचे आभार मानले. तर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी १ जुलैपासून करत असल्याचे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी त्याना अनोखी ओवाळणी दिली.

विधानभवनाच्या प्रांगणात विविध क्षेत्रातील महिला भगिनी एकत्र जमल्या होत्या. विधिमंडळात सादर झालेल्या अर्थसंकल्पात महिलांसाठी अनेक निर्णय घेण्यात आले. या निर्णयामुळे राज्यातील महिलांना मोठा दिलासा मिळाल्याने त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना ओवाळून राखी बांधून त्यांचे आभार मानले.

या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अर्थसंकल्पात राज्यातील महिला-भगिनींना दिलासा देणारे अनेक निर्णय आम्ही घेतले आहेत. मुख्यमंत्री माझी बहिण योजनेचा शासन निर्णयदेखील तातडीने काढण्यात आला असून त्याचा लाभ येत्या १ जुलैपासून भगिनींना देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील महिलांना दरमहा पंधराशे रुपये मिळणार आहेत. या निर्णयाचा फायदा अडीच कोटींहुन जास्त महिलांना होणार आहे.

महिलांना वर्षातून तीन सिलेंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनाही सुरू करण्यात येणार आहे. तसेच २५ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. बचतगटांतील महिलांचे खेळते भांडवल १५ हजारावरून वाढवून ३० हजार केले आहे. मुलींना उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा, १० हजार महिलाना पिंक रिक्षांचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे तसेच महिलांना मोफत प्रवास, ५० टक्क्यांपर्यंत मोफत एसटी प्रवास यापूर्वीच दिलेला आहे. राज्यातील सर्व माता-भगिनींच्या पाठीशी त्यांचा मुख्यमंत्री भाऊराया म्हणून नेहमी पाठीशी असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. राखी बांधल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी सर्व भगिनींचे आभार मानले.

या वेळी मंत्री दादाजी भुसे, आमदार प्रताप सरनाईक, आमदार नरेंद्र भोंडेकर आणि विविध क्षेत्रातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पैसे मोजण्याच्या बहाण्याने गंडा

**खोपोली : प्रतिनिधी**

पैसै मोजून देतो असे सांगून भामट्याने हातचलाखीने २० हजार ५०० रुपये रक्कम लंपास केल्याची घटना खोपोली शहरात घडली आहे.

माधुरी सुनील पाटील (वय ४०, रा. खानाव, खालापूर) या २७ जून रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, खोपोली येथे गौरी स्वयसहाय्यता महिला बचत गटाचे कर्जाचे पैसे काढण्याकरीता गेल्या होत्या.

बँकेत जावुन बचत गटाचे कर्जाचे एकूण ६० हजार रूपये रक्कम काढुन घेवुन ते पैसे मोजत असताना माधुरी यांच्या शेजारी बसलेल्या अनोळखी व्यक्तीने पैसे मोजुन देतो असे सांगितले. रक्कम मोजण्याचे बहाण्याने ६० हजारमधील २० हजार ५०० रुपये रोख रक्कम हातचलाखी करून फसवणुक करून नेली. माधुरी यांनी घरी जाऊन पैसे मोजले असता हा प्रकार लक्षात आल्यावर फसवणूक झाल्याचे समजले.

माधुरी यांनी याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्या विरूद्ध तक्रार दिली असून पोलीसांनी ४२० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोसई अभिजित व्हरांबळे हे करीत आहेत.

# व्यवसायाच्या चर्चेदरम्यान चोरीचा प्रयत्न

## गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

व्यवसायाची बोलणी करण्याच्या निमित्ताने घरामध्ये येऊन कपाटातील किमती वस्तू चोरी केल्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी प्रियंका नंदकिशोर पंडित (रा. वसंत नगरी, वसई) सिद्धार्थ जयदीप राणा (रा. अंधेरी) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

धनश्री प्रवीण पाटील या वळवली येथे राहत असून त्यांच्या ओळखीचे प्रियांका पंडित आणि सिद्धार्थ राणा हे त्यांच्या घरी आले. त्या वेळी इव्हेंटच्या वेळी ब्युटी पार्लरच्या व्यवसायासंदर्भात त्यांनी चर्चा केली. या दरम्यान त्यांनी ब्युटी पार्लरच्या सर्टिफिकेटची मागणी केली. सर्टिफिकेट हे पाटील यांच्या घराशेजारी असलेल्या ब्युटीपार्लर शॉपमध्ये होते. ते घेण्यासाठी त्या गेल्या. सर्टिफिकेट घेऊन थोड्या वेळाने परत आले असता प्रियांका पंडित या हॉलमध्ये बसलेल्या दिसल्या नाहीत. त्या बेडरूममध्ये गेल्या असता प्रियंका या लोखंडी कपाटाजवळ कपाट उघडून कपाटात काहीतरी करत असताना दिसून आल्या. या वेळी त्या कपाटात उचकटून चोरी करण्याचा प्रयत्न करीत होत्या. धनश्री पाटील यांनी कपाट बंद करून चावीने लॉक केलेले होते व चावी लहान पर्समध्ये ठेवून ती पर्स कपाटालाच लटकवलेली होती.

प्रियंका यांनी ती चावी काढून कपाट उघडले आणि त्यातून किमती वस्तू चोरी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांनी ११२ नंबरवर फोन करून पोलिसांची मदत मागितली. त्यानंतर दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# खारघर रेल्वे स्टेशन परिसरात पार्क केलेल्या दुचाकीची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

मोटरसायकलचा चोरी केल्याप्रकरणी अविनाश कुमार चौधरी (रा. अग्रोळी गाव, सेक्टर २९, सीबीडी बेलापूर) याच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात कलम ४०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

आशिष यादव हे ऐरोली येथे राहत असून ते एका कंपनीत इंजिनियर म्हणून काम करतात. खारघर येथे फिरण्यासाठी त्यांनी मोटरसायकल घेतली. मोटरसायकल खारघर रेल्वे स्टेशन समोरील सिडको पार्किंगमध्ये पार्क करत असतात ही पार्किंग कार साइन कंपनीने घेतलेली आहे. पार्किंगचे मॅनेजमेंट अविनाश चौधरी हे पाहतात. आशिष यांनी मोटरसायकल पार्किंगसाठी मासिक पास काढला होता. ते कामावरून घरी जात असताना त्यांनी मोटरसायकल पार्किंगमध्ये पार्क केली होती. त्यानंतर ते हैदराबाद येथे गेले. कामावर आले असता मोटरसायकल पार्क केलेल्या ठिकाणी दिसून आली नाही.

अविनाश चौधरी यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी काहीही माहिती दिली नाही. खारघर येथे पार्किंगमध्ये पार्क केलेली मोटरसायकलचा चोरी केल्याप्रकरणी अविनाश चौधरी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# विजय नाहटा फाउंडेशनतर्फे नवी मुंबईत स्वस्त दरात कांद्याचे वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

विजय नाहटा फाउंडेशनचे अध्यक्ष व शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या माध्यमातून स्वस्त दरात कांदे वाटप नवी मुंबईतील सानपाडा, नेरूळ (पूर्व) नेरूळ (पश्चिम) दारावे गाव शिरवणे, आग्रोळी गाव, वाशी या ठिकाणच्या नागरिकांना करण्यात आले.

या वेळी नवी मुंबईतील हजारो नागरिकांनी या स्वस्त दरात कांदे वाटपचा लाभ घेतला. या वेळी शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी सांगितले की, सध्या कांद्याचे भाव गगनाला भिडले असून महिलांचे किचन बजेट कोलमडले आहे. त्यामुळे रोजच्या जेवणातून कांदा गायब होत चालला आहे. हे जाणून महिलांच्या बजेटला थोडासा हातभार लागावा या हेतूने स्वस्त दरात कांदे वाटपाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

या वेळी विजय नाहटा यांच्या सोबत उपजिल्हा प्रमुख दिलीप घोडेकर, रोहिदास पाटील, शहर प्रमुख विजय माने, उपजिल्हाप्रमुख मिलिंद सूर्यराव, अजित सावंत, महिला जिल्हा प्रमुख सरोज पाटील, भावेश पाटील, संजय भोसले, कामगार सेनेचे नवी मुंबई प्रमुख प्रदीप बी. वाघमारे, अविनाश जाधव, गणेश पावगे, सूर्यकांत झेंडे, मनोज भोईर आणि मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

# सीवूड्स येथील सीबीएसई शाळा समस्यांच्या गर्तेत

## माजी नगरसेवक भरत जाधव यांचे आयुक्तांना निवेदन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीवुडस येथे मनपाच्या वतीने दिल्ली मंडळाची सीबीएसई शाळा सुरू केली, परंतु या शाळेमध्ये नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले की काही समस्येच्या गर्तेत ही शाळा अडकली जाते. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर पुन्हा विविध समस्यांच्या गर्तेत शाळा अडकली आहे. या समस्याची तातडीने सोडवणूक व्हावी अशी मागणी माजी नगरसेवक भरत जाधव यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.



**नवी मुंबईमधील सीवूड्स शाळेतील समस्या संदर्भात माझ्या कडे माहिती प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने पुढील योग्य कार्यवाही केली जाईल.**
**-संघरत्ना खिलारे, उपायुक्त, पालिका**

सीवुडस येथील सेक्टर ५० येथे २०१८ मध्ये सुरू झाली. ज्यावेळी ही शाळा सुरू झाली. त्यावेळी बालवाडी मध्ये घेतलेले विद्यार्थी इयत्ता सातवीच्या वर्गात शिक्षण घेत आहेत. या शाळेतील एकूण विद्यार्थ्यांची संख्या एक हजार ५००च्या आसपास आहे. या ठिकाणी प्रवेश घेण्यासाठी पालक वर्गाची धावपळ पाहायला मिळत आहे.

शाळेच्या नर्सरी व इतर वर्गाच्या राखीव जागांकरिता ऑनलाईन अर्ज प्राप्त होउनही १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. तरी प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाली नसल्याचे सांगण्यात येते. नर्सरीचे वर्ग सुरू करणे व इतर वर्गातील राखीव विद्यार्थ्यांनाही वर्गामध्ये तातडीने प्रवेश द्यावा. जेणेकरून त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली आहे.

ही शाळा सुरू होऊन आठ वर्ष होत आली आहेत, परंतू अद्याप पर्यंत शाळेला दिल्ली बोर्डाची मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात असल्याचे दिसून येते. या विषयी तातडीने मान्यता घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांना शाळेतून शैक्षणिक साहित्य बरोबरच इतरही वस्तू दिल्या जातात. त्यामध्ये दप्तर, वह्या, पुस्तके, शूज, सॉक्स, शाळेचा व खेळाचा गणवेश, रेणकोट इत्यादी वस्तूंचा समावेश असून या वेळेत वितरित कराव्यात. तसेच अद्यापपर्यंत पालकांना काही वस्तू बाहेरून विकत घेण्यास सांगण्यात आल्या असून त्याची बिले पालकांनी शाळेच्या सुचनेवरून शाळेत जमा केली आहेत, परंतू अद्याप पर्यंत ती रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली नाही, हे ही आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

शाळेमध्ये भरती केले जाणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरती ऑनलाईन पद्धतीने मेरीट नुसार राजकिय हस्तक्षेप, विरहित पारदर्शी व्हावी, अशीही विनंती माजी नगरसेवक भरत जाधव यांनी निवेदनात केली आहे.

**पान १ वरुन**

## 'नीट' परीक्षेसंदर्भातील सूचनांचा सकारात्मक विचार -अजित पवार

विधानसभेत 'नीट' परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराचा मुद्दा विविध सदस्यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला होता, मात्र अध्यक्षांनी स्थगन फेटाळल्यानंतरही सभागृहात या संदर्भात माहिती देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, 'नीट' परीक्षेत पेपरफुटी झाल्याचे प्रकार देशभरात घडले आहेत. बोगस विद्यार्थ्यांकडून पेपर लिहिण्यात आले आहेत. परीक्षेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचेही समोर आले आहे. असे प्रकार घडू नयेत, अभ्यास करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, दोषींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्नशील आहे. दोषींना कठोर शिक्षा आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक दंडाची तरतूद असलेला अध्यादेश केंद्र सरकारने जारी केला आहे. भविष्यात ही परीक्षा राज्यपातळीवर घेण्याचा प्रस्तावही तपासण्यात येत आहे. 'नीट' परीक्षा पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त व्हावी ही लाखो विद्यार्थ्यांसह, विरोधी पक्ष आणि राज्य सरकारचीही भूमिका आहे. त्या संदर्भात विरोधी आणि सत्ताधारी पक्षांनी केलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करू, असे आश्वासनही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

# तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या जनजागृतीसाठी आज मुंबईत परिषद

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ हे तीन नवीन फौजदारी कायदे १ जुलैपासून देशभर लागू होणार आहेत. या कायद्यांची माहिती सर्वसामान्यांना व्हावी यासाठी केंद्रीय विधी व न्याय मंत्रालयाने मुंबई वरळी येथील एनएससीआय सभागृहात रविवारी (दि. ३०) फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात भारताचा प्रगतीशील मार्ग या विषयावर परिषदेचे आयोजन केले आहे.

पूर्वीचे कायदे रद्द करताना नागरिक केंद्रित आणि लोकशाहीच्या गरजा पूर्ण करणाऱ्या या नवीन तीन गुन्हेगारी कायद्यांना लागू करण्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २५ डिसेंबर २०२३ रोजी मंजुरी दिली आहे. त्यामुळे भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ हे कायदे भारतीय दंड संहिता (१८६०चा ४५), फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४चा २) आणि भारतीय पुरावा कायदा, १८७२ (१८७२चा १) या पूर्वीच्या फौजदारी कायद्यांची जागा घेतील.

या परिषदेचे उद्घाटन राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कायदा व न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या उपस्थितीत होणार आहे. या परिषदेला गुजरात, पंजाब, हरियाणा, राजस्थान, जम्मू-काश्मीर, लडाख येथील न्यायमूर्ती, विधी व न्याय मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेला विविध उच्च न्यायालये, जिल्हा आणि कनिष्ठ न्यायालयांचे न्यायाधीश आणि माजी न्यायाधीश, वकील, पोलीस, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीचे प्रतिनिधी, सीबीआय, ईडी, आणि राष्ट्रीय तपास यंत्रणेचे अधिकारी उपस्थित असतील. विधी विद्यापीठातील विद्यार्थी आणि प्राध्यापकदेखील या परिषदेत सहभागी होणार आहेत.

# उलवेमध्ये नवीन फौजदारी कायद्याविषयी मार्गदर्शन



**उरण : बातमीदार, पनवेल : वार्ताहर**

१ जुलै २०२४पासून देशात नवीन फौजदारी कायदा अस्तित्वात येणार असून या नवीन फौजदारी कायद्याची जनतेला ओळख व्हावी, नवीन कायद्या विषयी जनतेत जनजागृती व्हावी या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत न्हावा शेवा पोलीस ठाणे आणि आम्ही उलवेकर मित्र मंडळ व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सचिन राजे येरुणकर यांच्या अध्यक्षतेखाली १ जुलैपासून जे नवीन कायदे लागू होणार आहेत. त्याबद्दल अंजुमन बागवान- वरिष्ठ पोलीस निरीक्षक न्हावा शेवा बंदर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

उलवे नोड येथील सेक्टर १७च्या श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात हे मार्गदर्शन शिबिर झाले. या शिबिरात नागरिकांना विविध कायद्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुमन बागवान यांनी नागरिकांना दिली. या वेळी रविशेठ पाटील, सचिन घरत, राजेंद्र घरत, राकेश घरत, विनोद थोरात, संदीप पाटील, निलेश पाटील, रोहन खंडू, साई पैकडे, अंकुश साळवे आदी उलवे नोड मधील रहिवाशी आणि विविध सामाजिक संस्था संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### नौपाडा येथे घरफोडीत ऐवजाची चोरी

**पनवेल :** चोरट्याने बंद घराच्या मुख्य दरवाजास आतमधून लावलेली कडी स्लाइडिंग खिडकीमधून हात घालून उघडली आणि त्यातून घरात प्रवेश करून दोन बॅग, एक मोबाईल आणि रोख रकमेची चोरी केली. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. योगेंद्र कुमार वार्षणीय हे नौपाडा गाव, कामोठे येथे राहत असून त्यांनी रूमचा मुख्य दरवाजाची कडी आतमधून बंद करून ते झोपले होते. सकाळी ते उठले असता त्यांना मोबाईल मिळुन आला नाही. तसेच रेग्झिनची बॅग आणि १९ हजार रोख रक्कम सापडून आले नाहीत. या वेळी त्यांनी मुख्य दरवाजाची कडी बघितली असता कडी उघडलेली दिसून आली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### मोडखरकर, पाटील यांचा सत्कार




**उरण :** उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे सदस्य विरेश मोडखरकर यांना रायगड जिल्हा वृत्तपत्र लेखक संघातर्फे पत्रभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि अजित पाटील यांनी वयाच्या ५१व्या वर्षी बीए पदवी संपादन केल्याबद्दल त्यांचा ज्येष्ठ पत्रकार संजय गायकवाड व पत्रकार संघाचे अध्यक्ष घनःश्याम कडू यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी विहंग कडू, दक्ष ठाकूर व अजित पाटील यांच्या चिरंजीव या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमास पत्रकार दिलीप कडू, पुजा चव्हाण, प्रवीण कोळआपटे रा.उ.म्हात्रे, पंकज ठाकुर, सुयोग गायकवाड व विद्यार्थ्यांचे पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### रेल्वे रूळ ओलांडताना एकाचा मृत्यू

**पनवेल :** नवीन पनवेल सेक्टर ५कडून खांदा कॉलनीकडे रेल्वे रूळ ओलांडताना एक ४० वर्षी व्यक्तीचा पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मालगाडीच्या धडकेने मृत्यू झाला आहे. मयत व्यक्तीची अजून ओळख पटलेली नाही.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे गव्हाण विभागात मोफत वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उलवे नोड २ आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वितरण करण्यात आले आहे. या अंतर्गत शुक्रवारी (दि. २८) न्हावा, न्हावाखाडी, गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजी नगर, बेलपाडा या विभागात विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.



यामध्ये न्हावा येथील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, न्हावेखाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालय, गव्हाण ग्रामपंचायती स्वर्गीय जनार्दन भगत सभागृह, कोपर येथील जिल्हा परिषद शाळा, शेलघर येथील जिल्हा परिषद शाळा, शिवाजीनगर येथील जिल्हा परिषद शाळा, बेलपाडा गावातील जिल्हा परिषद शाळा, गव्हाण कोपर येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज या ठिकाणी वह्या वाटपांचा कार्यक्रम घेण्यात आला.





या कार्यक्रमांना भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल पंचायत समिती माजी सदस्या रत्नप्रभा घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, स्कुल कमिटी चेअरमन चंद्रकांत भोईर, उपसरपंच राजेश म्हात्रे, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, भाजपचे उलवा नोड उपाध्यक्ष सी.एल. ठाकूर, ग्रामपंचायतीचे सदस्य सागरशेठ ठाकूर, तालुका सरचिटणीस जयवंत देशमुख, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रकाश कडू, न्यू इंग्लिश स्कूल न्हावेचे, मुख्याध्यपक प्रमोद कोळी, मिनाक्षी पाटील, ग्रामपंचायत सदस्या सुनीता भोईर, ललिता ठाकूर, रंजना पाटील, नरेश मोकल, तुषार भोईर, सुशीला पाटील, माजी सदस्य मंजुषा ठाकूर, कमलाबाई म्हात्रे, विनोद पाटील, दीपक भोईर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे खजिनदार भाऊशेठ पाटील, कोळी समाजाचे नेते विश्वनाथ कोळी, महादेव कोळी, नामदेव ठाकूर, माजी ग्रामपंचायत सदस्य स्नेहलता ठाकूर, वाहतूक सेल संघटना उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, सुहास भगत, सदाशिव ठाकूर, राम मोकल, अरुण मोकल, श्रीधर मोकल, अनंता ठाकूर, सुदर्शन घरत, विनायक कोळी, ग्रामपंचायत सदस्या कामिनी कोळी, उषा देशमुख, विष्णू पाटील, वामनशेठ म्हात्रे, रघुनाथ देशमुख, काशिनाथ पाटील, सुजाता पाटील, आनंदी घरत, सुहास भगत, गाव कमिटी अध्यक्ष वैभव घरत, जयश्री घरत अमृत भगत, श्रीधर भगत, प्रल्हाद भगत, रमेश घरत, सुदर्शन घरत, संतोष भगत, योगेश भगत, नितीन भगत, जीवन राठोड, गजानन ठाकूर, युवा नेते निलेश ठाकूर, आशा म्हात्रे, अनंत कोळी गुरुजी, अरुण घरत, अशोक घरत, ग्रामपंचायत माजी सदस्य इंदुमती पाटील, सुदर्शन घरत, अनिष पाटील यांच्यासह शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुर्बी शाळेत ग्रंथालयाची स्थापना

**पनवेल : वार्ताहर**

आज रोटरी खारघर मीडटाउनतर्फे खारघरच्या शासकीय मुर्बी शाळेत लायब्ररी-ग्रंथालय स्थापित करण्यात आले.

रोटरी खारघर मीडटाउन आणि एमपीरियान शाळेतले आमचे इनट्रैक क्लब चे मुलांनी १०० - १२५ पुस्तके दिली. शाळेतील सर्व मुलांना उपयोगी होईल, असे पुस्तके देण्यात आले. रोटरी खारघर मीडटाउनचे अध्यक्ष अनूप गुप्ताच्या मार्गदर्शन आणि शाळेचे अध्यापिका म्हात्रेच्या सहयोगाने ही ग्रंथालय स्थापित करण्यात आली. या वेळी रोटरी खारघर मीडटाउनचे सेक्रेटरी डॉ. रवी किरण, न्यू जनरेशन डायरेक्टर अनामिका, शुभांगी, दीपा पटेल, शाळेतले सर्व शिक्षक, मुले व स्टाफ उपस्थित होते.

रोटरी खारघर मीडटाउन चे अध्यक्ष अनूप गुप्ता यांनी सांगितले की, हे एक सुरुवात आहे आणि या पुढे ही आम्ही पुस्तके देऊ. अध्यापिका श्रीमती म्हात्रे यांनी सर्वांचा आभार प्रकट केले व रोटरी पुढे ही असाच आमचा गरजा पुरवणार, असे आशा व्यक्त केले.



## टेम्पोची वाहनाला धडक; चालक ठार

**पनवेल : वार्ताहर**

टाटा टेम्पोवरील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याने अज्ञात वाहनाला ठोकर दिली. यात टेम्पोचालक शेख यासीनभाई अहमदभाई याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



यातील टाटा टेम्पो क्र. जिजे ३१ टी ६९७० यावरील चालक शेख यासिनभाई अहमदभाई (वय ४८ वर्ष, रा. गुजरात) हे त्यांच्या ताब्यातील वाहन घेऊन मुंबई पुणे द्रुतगमार्गाने पुणे बाजूकडे वेगात चालवीत घेऊन जात असताना किमी ९.८०० (कोनजवळ) येथे आले. त्यांचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने टेम्पोच्या पुढे जात असलेल्या अज्ञात वाहनास जोरदार ठोकर मारून अपघात घडला आहे. या अपघातात चालक शेख यासीनभाई यांच्या तोंडाला, डोक्याला, छातीला, गंभीर दुखापत झाल्या असून त्यांना अपघात स्थळी हजर असलेल्या आयआरबी अंबुलन्समधील डॉ. मंगेश भगत यांनी तपासून मृत घोषित केले. त्यांना पुढील कार्यवाहीसाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे पाठविण्यात आले. तसेच अपघातग्रस्त वाहन आयआरबी क्रेनच्या साहाय्याने शोल्डर लेनवर घेण्यात आलेले असून त्यास बॅरिगेटिंग करण्यात आलेली आहे. तसेच महामार्गावर वाहतूक सुरळीत सुरू आहे.

अपघाताच्या ठिकाणी पळस्पे मोबाईलवरील स्टाफसह तसेच आयआरबी स्टाफ, देवदूत टीम, पनवेल तालुका पोलीस ठाणे पीएसआय हर्षल राजपूत व स्टाफ, पनवेल मोटार वाहन निरीक्षक संदीप कोतकर व स्टाफ हजर होते.

## जुन्या भांडणाच्या रागातून मारहाणीसह चाकूने वार

**पनवेल : वार्ताहर**

जुन्या भांडणाच्या रागातून चाकूने व लाथाबुख्याने मारहाण केल्याप्रकरणी वसिम लुंगी (रा. कळंबोली) यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सेक्टर ५ कळंबोली येथील इमरान अली मोहम्मद हसन शेख हे मित्रासह टॅक्सीने जात होते. या वेळी बालाजी कॉम्प्लेक्स समोर वसीम लुंगी नावाचा परिचयाचा व्यक्ती आढळून आला. यापूर्वी वसीम लुंगी याने इमरान याला मारहाण केली होती. त्यामुळे त्याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्याचा राग मनात धरून वसीम यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. टॅक्सीतून उतरून इमरान वसीम लुंगीकडे गेला आणि शिवीगाळ न करण्याबाबत त्याला सांगितले. मात्र त्यानंतर त्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. लाथा बुक्क्याने मारहाण करत असताना चाकूनेदेखील पोटावर वार केले. यात इमरान जखमी झाला.

## ‘सीकेटी’त रोटरॅक्ट क्लबचा पदग्रहण समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज(स्वायत्त) च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या चर्चासत्र सभागृहात शनिवारी (दि. २२) रोटरॅक्ट क्लब ऑफ सीकेटी ए.सी.एस. कॉलेज, न्यू पनवेल, रोटरॅक्ट क्लब ऑफ बीसीटी कॉलेज ऑफ लॉ आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ रिसर्च आणि फार्मसी, पनवेल यांच्या संचालक मंडळाच्या एकत्रित पदग्रहण समारोहाचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत दिमाखदार आयोजन करण्यात आले.



रोटरी इंटरनॅशनल ही स्वयंसेवी अशासकीय संघटना मानवी मूल्यांचे रोपण, पर्यावरण संधारण, कौशल्य विकास, युवक उत्थान, सामाजिक समरसता आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणारी संस्था आहे. याचेच महाविद्यालयीन स्तरावरील एकक म्हणजे रोटरॅक्ट क्लब होय. जे महाविद्यालयीन युवक आणि युवतींच्या व्यक्तिमत्व विकासातून त्यांना न केवळ सामाजिक उत्तरदायित्वाबाबत सजग बनवते अपितु त्यांना करियरविषयक नव-नवीन संधींसाठी तयार करते. याच पार्श्वभूमीवर सीकेटी महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभागाद्वारे रोटरॅक्ट क्लब स्थापन करून त्याच्या संचालक मंडळास रोटरी इंटरनॅशनल कडून मान्यता घेण्यात आली.

पदग्रहण सामारोहाची सुरवात प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन व गणेशवंदनेने झाली. यानंतर रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या युथ डायरेक्टर संजीवनी मालवणकर यांनी पदग्रहण समारोहाची बैठक सुरू झाल्याचे अधिकृतपणे जाहीर केले. यानंतर औपचारिक स्वागताचा कार्यक्रम पार पडला. यानंतर तीनही रोटरॅक्ट क्लबच्या अध्यक्षांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यानंतर सीकेटी महाविद्यालयाच्या रोटरॅक्ट क्लबची अध्यक्ष जान्हवी हातमोडे, बीसीटी विधी महाविद्यालयाच्या रोटरॅक्ट क्लबची अध्यक्ष प्रेरणा गायकवाड आणि विसपुते महाविद्यालयाच्या रोटरॅक्ट क्लबची अध्यक्ष अपूर्व भोसले यांनी आपापल्या संचालक मंडळाची उद्घोषणा केली व त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून कार्यभार सोपविण्यात आला. या सर्व नवनिर्वाचित संचालकांना डी.आर.आर. द्रीष्टी सिंग यांनी शपथ दिली.डॉ. शैलेश पालेकर, जिल्हा प्रशिक्षक, रोटरी क्लब यांनी उपस्थितांना संबोधित करताना प्राप्त पद ग्रहण केल्यानंतर पार पाडावयाची कर्तव्ये याचे स्मरण करून दिले. जिल्हा युवा संचालक व्ही.सी.म्हात्रे यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

समारोहाचे मुख्य अतिथी आमदार प्रशांत ठाकूर यांचा परिचय सीकेटी एन.एस.एस. विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. एन. परकाळे यांनी दिल्यानंतर, मुख्य अतिथी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना रोटरी क्लबच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध समाजाभिमुख उपक्रमांद्वारे सामाजिक उत्तरदायित्वाचे निर्वहन होत असल्याचे भाष्य केले. याबरोबर रोटरॅक्ट क्लबमध्ये काम करताना विद्यार्थ्यांनी सामाजिक उपक्रमांसोबतच आपल्या शैक्षणिक क्रियाकलापांनासुद्धा तितकेच महत्व देणे अगत्याचे असल्याचे प्रतिपादन केले.

सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांनी तीनही रोटरॅक्ट क्लबच्या संचालक मंडळास शुभेच्छा दिल्यानंतर सीकेटी रोटरॅक्ट क्लबच्या उपाध्यक्ष रिशिता सिंग यांनी आभार प्रदर्शन व्यक्त करत पदग्रहण समारोहाची सांगता केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिती कासारे व सीकेटी रोटरॅक्ट क्लबच्या जनसंपर्क अधिकारी साशा वाईंगणकर. या वेळी रोटरी क्लब ऑफ पनवेलचे सर्व पदाधिकारी, रोटरी क्लब पुणे येथील प्रतिनिधी, बीसीटी विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. सानवी देशमुख, रोटरॅक्ट क्लबचे मार्गदर्शक प्रा. राघव शर्मा, विसपुते महाविद्यालयाच्या रोटरॅक्ट क्लबच्या मार्गदर्शिका प्रा. ऐश्वर्या माने, सीकेटी महाविद्यालयाचे रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर, महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एन.एस.एस. विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. एन. परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वाय एन. मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. ए.व्ही. पाटील, प्रा. ए.एस.भानुशाली, एन.एस.एस. अभ्यासक्रम समन्वयक प्रा. आर. बी. माने यांनी परिश्रम घेतले.

## शहर अभियंता संजय जगताप सेवानिवृत्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे शहर अभियंता संजय जगताप व पाणीपुरवठा विभागातील मजूर दिलीप घोडेकर यांच्या सेवा निवृत्तीवेळी शुक्रवारी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहांमध्ये सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या वेळी त्यांना सन्मानित करण्यात आले.



या वेळी आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, हरेश केणी, विष्णु जोशी, उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सुधीर सांळुखे, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी, नातेवाईक उपस्थित होते.

या वेळी आयुक्त चितळे व माजी सभागृह परेश ठाकूर यांच्यासह माजी नगरसेवकांनीही जगताप यांच्या कार्याचा गौरव केला.

## जयराम ठाकूर यांचा सेवापूर्ती समारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर यांचा सेवापूर्ती समारंभ झाला.

विद्यालयाचे मुख्यध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रणिता गोळे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलचे उपशिक्षक प्रसन्न ठाकूर आणि कुसुम ठोंबरे, विद्यालयातील सर्व सेवक व विद्यार्थी प्रतिनिधी आणि सत्कारमूर्ती जयराम ठाकूर यांच्या पत्नी, दोन्ही मुली व मुलगा असे कुटुंबीय या समारंभास उपस्थित होते.

या वेळी सत्काराला उत्तर देताना जयराम ठाकूर यांनी प्रामुख्याने रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केलेल्या विशेष सहकार्याबद्दर कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थिनी दीक्षा वर्तक हिने रेखाटलेले श्री गणेशाची प्रतिमा त्यांना भेट दिली. तसेच यावेळी काही विद्यार्थिनी,शिक्षिका व माजी विद्यार्थिनी यांनीही त्यांना भेटवस्तू देऊन त्यांच्या प्रति आपल्या कृतज्ञता व्यक्त करून त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले तर सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी आभार मानले.

# चित्रपट प्रसिद्धीचा वाढता विळखा

## पोस्टर ते डिजिटल











**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

स्थळ : दादरमधील एक मध्यवर्ती भागातील हॉल, निमित्त : घरत गणपती या चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीचा सोहळा. चित्रपटाचे नाव व विषयानुसार श्रीगणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केलेली. चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक व कलाकार अगोदर श्रीसिद्धिविनायक मंदिरात जाऊन पूजा करतात व आशीर्वाद घेतात. मग हॉलमधील श्रीगणेशाची पूजा होते. चित्रपटाचा ट्रेलर लक्षवेधक वाटतो. कोकणाची संस्कृती आणि चित्रपटाची थीम यांचा सुरेख मेळ घातल्याचे दिसते आणि चित्रपटाबाबतची उत्सुकता वाढते. त्यानंतर अश्विनी भावे, अजिंक्य देव, शुभांगी गोखले, परी तेलंग, शरद भुताडीया इत्यादी कलाकार एकामागोमाग एक मुलाखती देतात. यासाठी लागणारी क्षमता व सातत्य त्यांच्यात होते हे विशेष.

पॅनोरमा स्टुडिओज सविनय सादर करीत आहेत. नॅविअन्स स्टुडिओ यांच्या सहकार्याने निर्माण झालेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन नवज्योत नरेंद्र बांदिवडेकर यांचे असून कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक, नम्रता बांदिवडेकर, नवज्योत नरेंद्र बांदिवडेकर, गौरी कालेलकर-चौधरी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

या घरत कुटुंबाच्या सदस्यांनी श्री सिद्धिविनायक मंदिराला भेट दिली. या चित्रपटातील कलाकारांनी सांगितलं की, 'आपलं प्रत्येकाचं गणपती बाप्पाशी खास असं नातं असतं. गणपतीच्या वेळी केलेली धमाल वेगळीच असते. हीच धमाल दाखवताना गणपती बाप्पाच्या कृपेने प्रत्येकाला नात्यांचे सूर कसे गवसणार? हे पहायला मिळणार आहे. हा चित्रपट पाहताना निखळ आनंद तर मिळेलच, पण या चित्रपटाची गोष्ट प्रत्येकाला आपल्या कुटुंबाची आणि प्रेमळ नात्यांची आठवण करून देईल हा विश्वास कलाकारांनी व्यक्त केला. हा चित्रपट प्रत्येकाला आपल्या घरातला वाटेल. या चित्रपटाच्या निमित्ताने मराठी रुपेरी पडद्यावर उत्तम कथानक व भव्यदिव्यता दिसेल असा विश्वास दिग्दर्शक नवज्योत नरेंद्र बांदिवडेकर यांनी व्यक्त केला.

राजदत्त दिग्दर्शित 'अर्धांगी (१९८५) हा अजिंक्य देवचा, तर प्रभाकर पेंढारकर दिग्दर्शित शाब्बास सुनबाई (१९८६) हा अश्विनी भावेचा पहिला चित्रपट. 'अर्धांगी'च्या अतिशय कौटुंबिक वातावरणात पार पडलेल्या पुणे शहरातील प्रीमियरला मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकाराना आमंत्रित केले होते, तर शाब्बास सुनबाईचा प्रीमियर मुंबईतील कोहिनूर थिएटरमध्ये (आताचे नक्षत्र) रंगला. विशेष उल्लेखनीय गोष्ट, बाळासाहेब ठाकरे यांची या प्रीमियरला विशेष उपस्थिती होती. सुलोचनादीदीही या वेळी उपस्थित होत्या.

तेव्हाची चित्रपट प्रसिद्धीची पद्धत आणि आता माध्यमे वाढल्यानंतरची पद्धत यातील फरक या दोघांनी चांगलाच अनुभवलाय. या काळात मुद्रित माध्यम, मग दूरचित्रवाणी, मनोरंजन उपग्रह वाहिन्या असे करत करत आज आपण ऑनलाईन जगात अर्थात डिजिटल युगात आलो आहोत. सगळं कसे झटपट, पटपट.

आजचे युग कसे आहे? एखाद्या नवीन चित्रपटाचा टीझर वा ट्रेलर प्रकाशित होणार आहे असे समजते न समजते, त्याच्या प्रकाशनचा सोहळा एकाद्या मल्टीप्लेक्स अथवा पंचतारांकित हॉटेलमध्ये सुरू असतानाच त्या टीझर/ट्रेलरचे दर्शन मोबाईलवर घडतेही, इतकेच नव्हे तर आजचा युवा वर्ग त्यावर आपली बरी-वाईट उत्फूर्त प्रतिक्रियाही देतात (कधी हक्काने ट्रोल करतात).

चित्रपट माध्यम व व्यवसायात पडद्यावर आणि पडद्याबाहेर रंग, रेषा यांचा प्रवास अगदी सुरुवातीपासूनच आणि त्याचा टप्प्या हा असा डिजिटल मीडिया आहे.

तुम्हाला थोडसं फ्लॅशबॅकमध्ये नेतो... चित्रपटाच्या सुरुवातीच्या काळात प्रेक्षकांना या चित्रपटाच्या खेळाची माहिती व्हावी यासाठीच वृत्तपत्रात जाहिरात दिली जाई. तेच महत्त्वाचे माध्यम होते. आपल्या देशातील चित्रपटाचे पहिले सादरीकरण झाले त्या लूमिनी बंधूनी फ्रान्समधून आणलेल्या 'अरायव्हल ऑफ ट्रेन' (७ जुलै १८९६ रोजी वॉटसन हॉटेल, दक्षिण मुंबई) या केवळ काही मिनिटांच्या लघुपटाची टाईम्स ऑफ इंडियातील जाहिरात ही आपल्याकडील चित्रपटाची वृत्तपत्रातील पहिली जाहिरात होय. सोशल मीडियात आता ती पाह्यला मिळतेय. दादासाहेब फाळके यांनी हिन्दुस्तानात 'राजा हरिश्चंद्र' (३ मे १९१३) या चित्रपटाव्दारे मुहूर्तमेढ रोवली, त्याचीही टाईम्स ऑफ इंडियात जाहिरात आली. तीही आज डिजिटल युगात पहायला मिळतेय. आजच्या पिढीतील चित्रपट रसिकांनी जुन्या काळातील चित्रपट विश्वात रस घेतल्यास त्यांना चित्रपटाचा इतिहास व भूगोल नक्कीच माहीत होईल. चित्रपट म्हणजे केवळ ग्लॅमर, गॉसिप्स, गल्ला पेटी आणि टाईमपास गप्पा नाहीत हे त्यातून लक्षात येत जाईल. त्यात एक वाटचाल चित्रपट प्रसिद्धीची आहे.

यातीलच एक गोष्ट सांगतो, 'राजा हरिश्चंद्र' या चित्रपटाला सुरत शहरात फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. म्हणून दादासाहेबांनी एक पत्रक काढले आणि ते सूरतमध्ये वाटले. त्यात म्हटले होते, फक्त बे अनामा पौना इंच चौडुं बे माईल अने बे माईल लांबू (फक्त दोन आण्यात पहा, दोन मैल लांब आणि फक्त पाऊणे इंच रुंदीचे ५७००० फोटोग्राफ्स). या पत्रकाचा प्रभाव पडला आणि चित्रपटाला गर्दी झाली. त्या काळात मग हळूहळू देशातील अनेक शहरात आणि मग गावातही अशी एकाद्या घोषवाक्याने चित्रपटाच्या नावाची पत्रके वाटण्याची संस्कृती आली आणि ती दीर्घकाळ रूजली. कुठे हातगाडीवर पोस्टर लावून, तर कुठे घोडागाडी वा बैलगाडीला पोस्टर लावून शहरभर अथवा गावभर रंगबिरंगी पत्रके वाटली जात. हातगाडीवाला भोंगा घेऊन जोरात बोले, तर घोडागाडीत त्या जोडीला ताशा वाजवला जाई. आजसाठी ओलांडलेल्या आपल्या लहानपणीचे असे दिवस एव्हाना नक्कीच आठवले असतील. चित्रपट अनेक प्रकारे भावविश्व व्यापून टाकते. आपल्या देशात चित्रपट व क्रिकेट समाजाच्या सर्वच स्थरांत मुरलयं त्यात जुन्या आठवणींचा ठेवा खूपच मोठा व महत्त्वाचा आहे.

आपल्या देशातील चित्रपटाचे पहिले पोस्टर बनले ते 'सैरंध्री' (१९३३) या चित्रपटाचे. बाबुराव पेंटर यांनी ते बनवले होते आणि दक्षिण मुंबईतील धोबीतलाव येथे आज जेथे मेट्रो चित्रपटगृह आहे, त्याच्याबरोबर समोर ते लावले आणि विशेष म्हणजे ते पहायला रसिकांची गर्दी होऊ लागली. त्यात नवेपण व कुतूहल होते. एक प्रकारे चित्रपट प्रसिद्धीत आता पोस्टर कला आली आणि आता चित्रकाराना आपली कला दाखवण्याची खूप मोठी व चांगली संधी मिळाली. चित्रपट बोलू लागला होता. व्ही. शांताराम यांचा 'अयोध्येचा राजा' (१९३२) हा पहिला मराठी बोलपट तर अर्देशीर इराणी यांचा 'आलम आरा' (१९३१) हा पहिला हिंदी बोलपट होय. तोपर्यंत मूकपटाची वाटचाल सुरू होती. चित्रपट बोलू लागला तरी आणखी चार पाच वर्षे मूकपट निर्माण झाले. हा प्रवास विकसित होताना चित्रपट निर्मितीची केंद्रेही वाढली आणि अन्य प्रादेशिक भाषांतील चित्रपट निर्मितीही आकार घेऊ लागली. महाराष्ट्रात मुंबई व कोल्हापूर तर देशात तेव्हा मद्रास (आताचे चेनई), कलकत्ता (आताचे कोलकत्ता), लाहोर (आता पाकिस्तानात) ही तेव्हाची चित्रपट निर्मितीची प्रमुख केंद्र होती. जसजसे हे प्रमाण वाढले तसे प्रत्येक ठिकाणी चित्रपटासह रंग रेषांचाही प्रवास सुरू झाला. बराच काळ चित्रपट कृष्ण धवल म्हणजेच ब्लॅक ॲण्ड व्हाईट स्वरूपात निर्माण होई, पण पोस्टर, मग मोठी होर्डींग्स, थिएटर्सवरची होर्डिंग्स मात्र रंगीत असे. विशेष म्हणजे थिएटर डेकोरेशन पाहण्यात विशेष रस घेणाराही चित्रपट शौकिन (की व्यसनी?) होता. मुंबईत त्या काळात प्रामुख्याने गिरगावातील मॅजेस्टिक (१९७२-७३ साली बंद), ऑपेरा हाऊस, इंपिरियल, मिनर्व्हा (जुने व नंतरचे) अशा अनेक चित्रपटगृहांवरचे पोस्टर डेकोरेशन पाहण्यास रसिक गर्दी करत. मी गिरगावात लहानाचा मोठा होताना या चित्रपटगृहावरील थिएटर डेकोरेशन एन्जॉय केलीत. मॅजेस्टीक चित्रपटगृहावरची मराठी चित्रपट व हिंदी पौराणिक चित्रपटाचे डेकोरेशन आवर्जून पाहण्यासारखे असते. इंपिरियल थिएटरवरचे डेकोरेशन पाहून शेजारच्या गल्लीत शिरताच नाझ थिएटरवरचे डेकोरेशन लक्ष वेधून घेई. ते दिवसच वेगळे होते. डेकोरेशन पाहूनही चित्रपट कसा असेल याचाही निष्कर्ष काढला जाई.






MAJESTIC
-TALKIES-
--Commencing Saturday 14th March 193[illegible]--
IMPERIAL MOVI-TONE
ALAM-ARA
FEATURING :-
ZUBEDA - VITHAL - ELIZAR - ZILLOO - PRITHVIRAJ AND
AN ALL STAR CAST.
Daily Three Shows at 5-30, 8 and 10-30 p.m.
Sat. Sun. and Bank Holidays 3 p.m.
[illegible]
Box 3-5-0 Rear. 1-8-0 Second 0-5-0
Bal. 2-4-0 First 1-2-0 Third 0-4-0
Every Sunday special show at 10 A. M. for School Boys and Girls.

पोस्टर रेखाटण्यातील त्या काळातील महाराष्ट्रीय नावे म्हणजे, जी. कांबळे, नाना लोंढे ( यांची दादर येथे नवरुप चित्र नावाची जाहिरात संस्था होती), एन.आर. भोसले ( सुदेश भोसले याचे वडील), जय आर्ट, गुरुजी बंधू, जी. कांबळे.... त्या काळात चित्रपती व्ही. शांताराम यांच्या चित्रपटांची पोस्टर व बॅनर्स वैशिष्ट्यपूर्ण असत. आपल्या चित्रपटाच्या थीमनुसार ती असावीत आणि प्रेक्षकांसमोर चित्रपट पोहचण्याचा हादेखील एक महत्त्वाचा मार्ग आहे असे ते मानत. येथे दिग्दर्शक दिसतो असे कौतुकाने म्हणायला हवे. चित्रपट निर्मितीतील सर्वच अंगात रस घेतला पाहिजे हेच यातून सुचित होते.

त्या काळातील महत्वाचे माध्यम असलेल्या वृत्तपत्रातील जाहिरातीत विविध प्रकारची डिझाईन येऊ लागली. मग वाचनीय आणि चित्रपट हिताच्या कॅचलाईनही येऊ लागल्या. बॉम्बे पब्लिसिटी सर्विस या कंपनीचे सर्वेसर्वा वसंत साठे व एम.बी. सामंत त्या वाचनीय लिहित. जोडीला ए.डी. वालावलकर व अरविंद सामंत असत. वसंत साठे राज कपूरच्या चित्रपटाचे लेखक असल्याने त्यांच्याकडून आर.के. फिल्मच्या चित्रपटाच्या पोस्टरच्या कल्पना समजत. (हे वसंत साठे आणि कॉंग्रेस नेते वसंत साठे या दोन भिन्न व्यक्ती आहेत हे आजच्या डिजिटल पिढीतील व्हॉटस्ॲप युनिव्हर्सिटीत ओरडून सांगावे लागतेय.)

वसंत साठे यांची पटकथा असलेल्या व राज कपूर निर्मिती व दिग्दर्शित बॉबी ही प्रेमकथा आहे हे त्याच्या लेटरिंगमध्येही दिसतेय. दो आँखे बारह हाथ, मदर इंडिया, मुगल-ए-आझम, गंगा जमुना, प्यासा, कागज के फूल, झनक झनक पायल बाजे, नवरंग, काला पानी, नया दौर, दो बिघा जमीन, बंदिनी, गाईड, मुझे जीने दो अशा अनेक क्लासिक चित्रपटांची पोस्टर व होर्डींग्स अप्रतिम असत. आजही त्यांची कलात्मक पोस्टर लक्षवेधक ठरताहेत हे विशेष उल्लेखनीय आहे. चित्रपटाचे नाव आठवले तरी ही पोस्टर डोळ्यासमोर येणारच हे यश काही वेगळेच. हीदेखील एक चित्रपट संस्कृती.

आपल्या देशात मराठी व हिंदी यासह देशात लहान मोठ्या मिळून देशात जवळपास तीस प्रादेशिक भाषेत चित्रपट निर्माण होतात.., पण त्या संख्याबळाचा अभिमान तो कशाला हवा? आज पॅन इंडिया चित्रपट निर्मितीत एका भाषेतील चित्रपट अन्य चार पाच भाषेत डब होऊन अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचताहेत. आणि आजच्या रसिकांनीही व्यापक दृष्टिकोन ठेवला आहे हेही विशेषच. ओटीटी प्लॅटफॉर्मचे ते एक देणे आहे.

पूर्वी चित्रपट व्यावसायिकांची मक्का नाझ चित्रपटाची मुख्य इमारत होती (तेथील सातही मजल्यावर चित्रपट वितरकांची कार्यालये होती) तेथे गुरुवारी एक दृश्य हमखास दिसे, ते म्हणजे मुंबईतील अनेक चित्रपटगृहांची रंगवलेली पोस्टर वा होर्डींग्स रवाना होत. त्यासाठी हातगाडी, टेम्पो वा ट्रकचा वापर होई. चित्रपट उतरल्यावर ही सगळी रंगवलेली पोस्टर/होर्डींग्स पाठीमागील गोडाऊनमध्ये जमा होत. त्या काळात अनेक चित्रपट सेकंड रन (एखाद्या परिसरातील थिएटरमध्ये तोच चित्रपट पुन्हा), रिपिट रन (अनेक गाजलेले चित्रपट दोन तीन वर्षांच्या अंतराने पुन्हा प्रदर्शित होत) आणि मॅटीनी शो (देव आनंद, शम्मी कपूरचे अनेक म्युझिकल चित्रपट, तसेच काही जबरा संगीत असलेले भूतपट वा रहस्यपट नंतर सकाळच्या साडेअकराच्या खेळाला लागत) यासाठी हीच रंगवलेली पोस्टर/होर्डींग्स पुन्हा उपयोगी पडत. त्यांनाही रिपिट व्ह्यू होती असेच कौतुकाने म्हणूया. आज काळ खूपच पुढे गेलाय. आज दक्षिण भारतातील प्रादेशिक भाषेतील चित्रपटांनी पब्लिसिटीचा फोकस जास्त डार्क ( खरंतर भडक) केलाय. Aho vikramaarta हा चित्रपट ताजे उदाहरण. बाहुबली ने जे पेरलेय ते असे उगवलयं.

चित्रपट प्रसिद्धीच्या अफाट व अचाट वाटचालीचा हा जणू ट्रेलर आपणासमोर मांडला आहे. पूर्वी माध्यमे कमी होती तरी चित्रपट प्रसिद्धी प्रभावी होती. आज मीडिया वाढलाय आणि चित्रपटाची पूर्वप्रसिद्धीही तेवढ्याच जोरशोर से करावी लागतेय...

# नाटककार, कवी, अभिनेते, दिग्दर्शक बाळ कोल्हटकर



महाराष्ट्राचे लाडके नाटककार, उत्कृष्ट भावनाप्रधान भूमिका करणारे नट बाळकृष्ण हरी कोल्हटकर ऊर्फ बाळ कोल्हटकर म्हणजे नाट्यसृष्टीतील एक मानबिंदू. त्यांचा आज स्मृतिदिन. कोल्हटकरांचा जन्म २५ सप्टेंबर रोजी सातारा येथे झाला. शिक्षण जेमतेम सातवीपर्यंतच झाले. लहानपणापासून नाटकांची अतिशय आवड तसेच लेखनाचीही आवड होती. त्यामुळे लहानपणीच त्यांच्या लेखनाला सुरुवात झाली. वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी त्यांनी जोहार हे आपले पहिले नाटक लिहिले.

१९४७पर्यंत त्यांनी रेल्वे खात्यात नोकरी केली. त्यानंतर लेखनासाठी आणि रंगभूमीसाठी त्यांनी आपले पुढील आयुष्य वाहून घेतले. त्यांनी लिहिलेली नाटके ही भावनाप्रधान आणि कौटुंबिक अशी असत. ज्यांना पूर्वी लोक हसायचे आणि टिंगल करायचे असे बाळ कोल्हटकर प्रेकाक्षांची नस नेमकी ओळखत असत.

बाळ कोल्हटकर हे अंबरनाथच्या खेर विभागात १९५९ ते १९७२ या काळात वास्तव्यास होते. त्यांनी खेर विभागातील प्रसिद्ध हेरंब मंदिरात 'वाहतो ही दुर्वांची जुडी', 'वेगळं व्हायचंय मला', अशी काही प्रसिद्ध नाटकं लिहिली तसेच सीमेवरून परत जा, लहानपणा देगा देवा, देव दीनाघरी घावला, देणाऱ्याचे हात हजार, उघडलं स्वर्गाचे दार, इत्यादी त्यांची गाजलेली नाटके. तीन दशकांच्या साहित्यिक कारकिर्दीत यांनी ३०हून अधिक नाटके लिहिली. त्यांच्या नाटकातील प्रसंग भले बेतलेले असोत, अति भावनिक असोत, पण सामान्य प्रेक्षकांना अश्रू पुसायला लावत. नाटक वेळेवर सुरू करणे आणि ते प्रामाणिकपणे सादर करणे, शिवाय ते लोकप्रिय करणे त्या काळात अवघड होते. बऱ्याच नाटकांचे हजाराच्या वर प्रयोग झाले. व्यवसायिक रंगभूमीसाठी त्यांनी नाटकं लिहिली होती, तरी प्रत्येक नाटकातून काही मूल्य जपली होती.

सर्वसामान्य प्रेक्षकांच्या आवडीची कल्पना असलेल्या कोल्हटकरांनी मध्यमवर्गीय कुटूंबातील प्रश्न हाताळणारी सुखांत नाटकेही लिहिली. प्रेक्षकांना जे हवे, जे आवडते ते त्यांनी रंगभूमीवर उभे केले. ते उभे करताना कथानकाची सुसूत्रतेनी बांधणी, काव्यात्मक संवाद आणि सुभाषितवजा टाळी घेणारी काही वाक्ये याचा त्यांनी प्रयत्नपूर्वक उपयोग करुन नाटकं यशस्वी केली. नाटककारांच्या बरोबरीने ते रंगभूमीचे उत्कृष्ट नटही होते. त्यांनी केलेल्या भूमिका अतिशय गाजल्या. कोल्हटकर यांनी लिहिलेल्या दुरितांचे तिमिर जावो, वाहतो ही दुर्वांची जुडी, मुंबईची माणसे, एखाद्याचे नशीब इत्यादी नाटकांचे हजारांहून अधिक प्रयोग झाले.

दुरितांचे तिमिर जावो या नाटकांचे पंधराशे प्रयोग, 'वाहतो ही दुर्वाची जुडी' या नाटकाचे चौदाशे प्रयोग, मुंबईची माणसे' याचे जवळपास दोन हजाराच्या वर तर 'एखाद्याचे नशीब' या नाटकांचे हजारावर प्रयोग झाले. कोल्हटकरांचे शिक्षण सातव्या इयत्तेपर्यंतच झाले होते. त्यांनी वयाच्या पंधराव्या वर्षी प्रथमच जोहार नावाचे नाटक लिहिले. १९४७ सालापर्यंत त्यांनी रेल्वेत नोकरी केली, मात्र त्यानंतर पेशाबाबत त्यांच्या आयुष्यात बरेच चढउतार आले. काही प्रसंगी खायची पंचाईत अनुभवलेल्या कोल्हटकरांनी या काळात नाटके व चित्रपटांच्या संहिता लिहिण्याचे काम चालूच ठेवले.

नाटककारांच्या बरोबरीने ते रंगभूमीचे उत्कृष्ट नट ही होते. त्यांनी केलेल्या भूमिका अतिशय गाजल्या. त्या आजही लोकांच्या आठवणीत जशाच्या तशा आहेत. हेच एका नाटककाराचे आणि नटाचे मोठेपण आहे. अशा या ज्येष्ठ नाटककाराचे ३० जून १९९४ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

# कृषी विभागाच्या कल्याणकारी योजना

विविध पिकांच्या संकरीत वाण निर्मितीमुळे देशांत हरितक्रांतीचा पाया घातला गेला. यानंतरच्या काळातील पंचवार्षिक योजनांद्वारे शेती विकासावर विशेष भर देण्यात आला. कृषी विद्यापीठातील सुधारित तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यत पोहचवण्यासाठी आखलेल्या पीक प्रात्यक्षिके, प्रक्षेत्र भेटी, कृषी तंत्रज्ञान प्रचारसभा, चर्चासत्रे, मेळावे, प्रदर्शने इत्यादी कार्यक्रमांच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे कृषी उत्पादनवाढीमध्ये मोलाची भर पडली. यामुळे आपण अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्ण झालो असलो तरी अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता हे कृषी विभागाचे एकमेव उद्दिष्ट नसून शेतकऱ्यांना उपलब्ध संसाधनांचा परिपूर्ण वापर करून अधिकाधिक आर्थिक फायदा मिळवून देणेसुद्धा नितांत गरजेचे आहे. यासाठी व्यापारक्षम शेतीची कास धरावी लागेल. मुक्त आर्थिक व्यवस्था व जागतिक व्यापार व्यवस्थेचा फायदा करून घेण्याच्या दृष्टीने कृषी, फलोत्पादन व जलसंधारण क्षेत्रात कृषी उत्पादन वाढ, निर्यातवृद्धी व कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या अनेकविध योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहेत.

केंद्र व राज्य शासन कृषी क्षेत्रातील विकासासंदर्भात विविध योजना राबावत आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे शेती उत्पादन वाढण्यासाठी, पिकांचे संरक्षण आणि त्यांची जोपासना करण्यासाठी, पिकांवरील आलेली कीड नियंत्रण करण्यासाठीचे कार्यक्रम आणि, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत व्यापारी पिकांसाठी असलेल्या योजना यांचा यामध्ये समावेश आहे. सिंचनाच्या चांगल्या सोयी उपलब्ध झाल्यामुळे शेती आणखी फायद्यात आणणे ही येणाऱ्या काळासाठी गरजेचे आहे. हा संपूर्ण विचार करता कृषी विभागामार्फत अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत.

**पंतप्रधान पीक विमा योजना**

केंद्र शासनाने सुरू केलेली पंतप्रधान पीक विमा योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि फलदायी असून या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्याने फक्त एक रुपया भरून नाव नोंद करायचे आहे. विमा हप्त्याची रक्कम ही केंद्र शासन भरणार आहे. शेतकऱ्याने आपल्या आधार कार्डची प्रत, ७/१२ उतारा, बँक पासबुक झेरॉक्स, पीक पेरणी स्वयंघोषणा पत्र घेऊन आपल्या जिल्ह्यातील किंवा आपल्या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन नाव नोंदणी करावी हे सर्व केल्यानंतर त्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. अवकाळी झालेली अतिवृष्टी अथवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे जमीन नापेर राहिल्यास त्या क्षेत्रालाही विमा संरक्षण मिळण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली आहे.

**अन्न आणि पोषण सुरक्षा :** अन्नधान्य पिके (भात, कडधान्य, भरडधान्य (मका), पौष्टिक तृणधान्य व टीआरएफए कडधान्य) या योजनेंतर्गत भात, कडधान्य, भरडधान्य (मका) व पौष्टिक तृणधान्य (ज्वारी, बाजरी, नागली, इ. पिकांची पीक प्रात्याक्षिके राबविली जातात. अन्नधान्य पीक क्षेत्र विस्तार व उत्पादकतेमध्ये वाढ करून शेतकऱ्यांच्या उत्पादनात शाश्वत वाढ करणे, जमिनीची सुपीकता व उत्पादन क्षमता वाढविणे, शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

**कृषी यांत्रिकीकरण** : शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे, पीक रचनेनुसार गरजेनुरुप व मागणी प्रमाणे पूर्वतपासणी केलेली दर्जेदार कृषीऔजारे शेतकऱ्यांना अनुदानावर उपलब्ध करून देणे व कृषी उत्पादन प्रक्रियेत अद्ययावत यंत्रसामुग्रीच्या वापरासाठी प्रोत्साहीत करणे हे प्रमुख उद्देश साध्य करण्यासाठी जिल्ह्यामध्ये कृषी यांत्रिकीकरण योजना राबविण्यात येत आहे. ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि ट्रॅक्टरसोबत चालणारी औजारे, ठिबक आणि तुषार सिंचन सेट, शेडनेट, पॉली हाऊस, कांदाचाळ,प्लास्टिक मल्चिंग इत्यादी गोष्टींसाठी अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यास त्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. महाडीबीटी पोर्टल- https://mahadbt.maharashtra.gov.in

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना : या योजनेंतर्गत गांडूळ खत युनिट, बांबू लागवड,फळबाग लागवड,नाडेप कंपोस्ट युनिट बनवणे, इतर लाभ दिले जातात. यातील फळबाग लागवड कार्यक्रम योजनेतंर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक शेतजमीनीवर फळबाग लागवड करता येते.

**भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना** : शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, पीक रचनेत बदल घडवून आणणे व प्रकिया उद्योगांसाठी आवश्यक कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे. हे प्रमुख उद्देश साध्य करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना राबविण्यात येत आहे. जे शेतकरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकत नाहीत असे शेतकरी जास्तीत जास्त सहा हेक्टर क्षेत्र मर्यादेत या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

**पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)** : सोयाबीन, कापूस, हरभरा, भात, मका, ज्वारी व ऊस या महत्त्वांच्या प्रमुख पिकांवर वारंवार तसेच आकस्मिकरीत्या उद्भवणाऱ्या कीड रोगांच्या प्रादुर्भावामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान व उत्पादनात होणारी घट लक्षात घेता यासाठी कीड व रोग सर्वेक्षण, सल्ला, जन जागृती व व्यवस्थापन याबाबतची शाश्वत यंत्रणा तयार करण्याच्या दृष्टीने पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांमध्ये कीड व रोगांची ओळख निर्माण करणे, त्यांना प्रशिक्षित करुन कीड रोगांचे वेळीच व्यवस्थापन करणे, कीडरोगांच्या प्रादुर्भावाबाबत जागरूकता निर्माण करणे व पुढील संभाव्य नुकसान टाळून उत्पादनात वाढ करणे, पिकांचे सर्वेक्षण करून हंगामनिहाय प्रमुख कीडरोगांच्या प्रादुर्भावाबाबत शेतकऱ्यांमध्ये जाणीव निर्माण करणे व त्यांना वेळीच उपाययोजना सुचवण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांसाठी कृषी विभागामार्फत ऊस सुपर केन नर्सरी प्रात्याक्षिके, हुमणी नियंत्रणासाठी प्रकाश सापळे उभारणी, बीज प्रक्रिया प्रात्याक्षिके, फलोत्पादन यांत्रिकीकरण, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-प्रती थेंब अधिक पीक, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्प उभारणी, केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान क्षेत्र विस्तार, सामूहिक शेततळे (राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत), कांदाचाळ उभारणी, आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना, कृषी पायाभूत सुविधा योजना, शेतकरी मासिक, महा-डीबीटी, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत-मृद आरोग्य पत्रिका योजना प्रशिक्षणासह प्रात्यक्षिक कार्यक्रम, परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती), डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती), जमीन आरोग्य पत्रिका कार्यक्रम, कृषी विभागामार्फत दिले जाणारे विविध कृषी पुरस्कार (राज्य पुरस्कृत योजना) अशा विविध योजना व उपक्रम जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहेत. कृषी विभागाच्या योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, योजनांबाबत अधिक माहितीसाठी स्थानिक पातळीवरील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा.

**(साभार : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन)**

# कर्जतमध्ये 'जलजीवन'ची बैठक

## आमदार महेंद्र थोरवे यांची उपस्थिती; योजना पूर्ण करण्याचे निर्देश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेणेबाबत आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या वेळी प्रत्येक योजनेच्या कामाचा आढावा घेण्यात आला.

बाळासाहेब भवन जनसंपर्क कार्यालयात जलजीवन मिशन योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांचा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जिल्हाप्रमुख संतोष भोईर, तालुका प्रमुख संभाजी जगताप, माजी नगरसेवक संकेत भासे, अभिषेक सुर्वे, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग उपअभियंता अनिल मेटकरी, लघु पाटबंधारे उपविभाग जलसंधारण अधिकारी सुजित धनगर, शाखा अभियंता संजय करडे व पाणीपुरवठा विभागाचे इतर अधिकारी व ठेकेदार उपस्थित होते.





या बैठकीत कर्जत तालुक्यातील मंजूर व प्रगतीपथावर तसेच पूर्ण झालेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला. यातील जवळपास कर्जत तालुक्यात १२३ योजना मंजूर असून २४ योजना पूर्ण व ९२ योजना प्रगतीपथावर आहेत, असे अधिकारी वर्गाकडून सांगण्यात आले.

या बैठकीत काम करत असताना व जलजीवन मिशन योजना परिपूर्ण करत असताना तेथील निर्माण होणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. या योजना योग्य पद्धतीने लवकरात लवकर पूर्ण करून त्या त्या भागातील लोकांना या योजनांचा लाभ करून द्यावा, अशा सूचना आमदार थोरवे यांनी अधिकारी व ठेकेदारांना दिल्या.

# अलिबागमधील कचरा उचलणाऱ्या ठेकेदार कंपनीवर कारवाई करा

## अमर वार्डे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरातील कचरा उचलण्यावर होणारा खर्च १५व्या वित्त आयोगातील आहे. हा खर्च जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेस अधिन राहून केला जातो. त्यामूळे अलिबाग शहरातील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाचा ठेका घेतलेल्या व्हीडीके फॅसिलिटी सर्व्हिसेस मर्यादीत या ठेकेदार कंपनीवर करारभंग केल्याप्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी अलिबाग नगर परिषदेचे माजी नगरसेवक अमर वार्डे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

अलिबाग नगर परिषदेने शहरातील कचरा संकलन आणि स्वच्छता ठेवण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मावळ येथील व्हीडीके फॅसीलिटी सर्व्हीसेस मर्यादीत कंपनीला ठेका दिला आहे. त्यांच्या करारातील अटी शर्तींचा कंपनीकडून भंग झाला असल्याचे अमर वार्डे यांनी या जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

शहरातील कचरा संकलना अनेक त्रृटी असूनही नगर परिषद प्रशासनाने ठेकेदार कंपनीविरोधात ठोस कारवाई केल्याचे दिसून येत नाही. उलट ठेकेदार कंपनीला पाठीशी घातले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ठेकेदार कंपनी आणि अलिबाग नगर परिषद या दोघांवरही कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग माणगाव अंतर्गत खरीप हंगाम २०२४मध्ये शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात भात, नाचणी या पिकांकरिता प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत ई पिक विमा उतरविता येणार आहे. माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा याकरिता प्रधानमंत्री पिक विमा योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणी न होणे, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट होऊन क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व भात काढणीनंतर शेतात सुकविण्यासाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे आर्थिक नुकसान या सर्व बाबींकरिता विमा संरक्षण लाभ होणार आहे. खरीप हंगामामध्ये माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात भात व नाचणी या पिकांचा ई. पिक विमा उतरवित येईल. शेतकरी एक रुपया वजा जाता राज्य शासनामार्फत उर्वरित विमा हप्ता भरण्यात येणार आहे. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक स्वरूपात आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी न होण्याचे घोषणापत्र योजनेत सहभागी होण्याच्या मुदतीच्या सात दिवस आधी बँकेत सादर करावे. घोषणापत्र दिलेल्या शेतकऱ्यांना योजनेच्या सहभागातून वगळण्यात येईल.

तालुक्यातील भात, नाचणी पिकाकरिता अधिसूचित असलेल्या माणगाव, इंदापूर, गोरेगाव, मोर्बा, लोणेरे, निजामपूर, विळे या सात महसूल मंडळांमध्ये ही योजना लागू करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये नियुक्त चोलामंडलम, क्रॉप इन्शुरन्स कंपनी लिमिटेड मार्फत पिक विमा योजना राबविण्यात येणार आहे. भात पिकासाठी विमा संरक्षित रक्कम रुपये प्रति हेक्टर ५१ हजार ७६० जोखिमस्तर ७० टक्के तर नागली पिकासाठी विमा संरक्षित रक्कम वीस हजार प्रती हेक्टर जोखिमस्तर ७० टक्के इतका आहे. ई पिक पाहणीद्वारे नोंदविलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांनी ई पिक ॲप अंतर्गत पिकाची नोंदणी करणे आवश्यक आहे. योजनेचे अंमलबजावणी करताना रिमोट सेंसिंग टेक्नॉलॉजी, ड्रोन, स्मार्टफोन, डिजिटल माहिती स्त्रोत अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर जमा करण्यात येईल. विविध जोखमी अंतर्गत निश्चित होणारी नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनातील अटी व शर्तीच्या अधीन राहून केली जाईल.

खरीप हंगाम २०२४ करिता अंतिम मुदत ३१ जुलै २०२४ अशी आहे. पिक विम्यासाठी अर्ज सादर करताना बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी सातबारा उतारा, आधार कार्ड, पेरणी घोषणापत्र, बँक खात्याचे तपशील सोबत जोडणे आवश्यक आहे. पिक विमा पोर्टल, पिक विमा कंपनी स्थळ, बँक, पिक विमा पोर्टल इत्यादी माध्यमांद्वारे शेतकरी योजनेत सहभागी होऊन शकतात. ई पिक विमा योजनेचे अर्ज भरताना बँकांमधील गर्दी न करता याकरिता जन सुविधा केंद्रा मार्फत सी.एस.सी सेंटर किंवा स्वतः ऑनलाईन पद्धतीने पिक विमा अर्ज दाखल करण्यात येईल. शेतकऱ्यांना पीक विमा भरताना कुठलीही अडचण येणार नाही याची काळजी कृषी विभागाकडून देण्यात येईल. विमा कंपनीमार्फत १८०० २०८ ९२०० हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.

ही पीक योजना विमा योजनेच्या सविस्तर माहितीसाठी माणगाव तालुका पीक विमा प्रतिनिधी रवींद्र वाठोरे (९७६२८५८७७८), ईमेल customercare@choams.murugappa.com तसेच गावाचे कृषी सहाय्यक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, माणगाव येथे संपर्क साधून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी माणगाव अजय वगरे यांनी केले आहे.

# पदवीधर निवडणूक मतदानात महिलांचा विशेष सहभाग

**पेण : प्रतिनिधी**

पदवीधर मतदार संघाच्या निवडणूक नुकतीच पार पडली असून या निवडणुकीसाठी महायुती व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात आपापल्या पक्षाचा प्रचार केला पेणमध्येही मोठ्या प्रमाणात या मतदानासाठी पक्षाचे कार्यकर्त्यांनी जोमाने काम केले, परंतु या मतदार संघात खऱ्या अर्थाने ज्यांनी आघाडी घेतली त्या पदवीधर मतदार तथा माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी.

पेण तालुक्यात मोठ्या प्रमाणात महिला पदवीधर मतदार असून या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निरंजन डावखरे यांचा प्रचार



व प्रसार करण्यात पदवीधर महिलांनापुढे आणण्याचे काम प्रितम पाटील व त्यांच्याबरोबर माजी जि. प. अध्यक्षा नीलिमा पाटील यांनी केले असून राजकिय क्षेत्रातील पदवीधर महीलांनी या कोंकण पदवीधर निवडणूकीत मतदानाचा हक्क बजावला. माजी नगरसेविका धनश्री समेळ, भाजप महीला प्रमुख निशीगंधा गुंड, यांनी गुरूकुल स्कूल, म्हाडा कॉलनी येथे मतदानाचा हक्क बजावला. आगामी विधानसभा निवडणुकीत या रणरागिणीकडून मोठ्या अपेक्षा आहेत. त्या महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.

प्रितम ललित पाटील या आमदार रविशेठ पाटील यांच्या सूनबाई आहेत. त्या गेले १० वर्ष पेण नगर परिषदेच्या नगराध्यक्ष आहेत. या पदावर असताना अनेक विकासकामे करून पेण शहराचा कायापालट केला आहे. तसेच एमएसआरडीए संचालक असताना त्यांनी रिंगरोड करीता भरघोस निधी पेण शहराकरीता आणला. पहिली टर्म नगरसेवक मधुन नगराध्यक्ष झाल्या तर दुसरी टर्म खुल्या प्रवर्गातून नगराध्यक्ष झाल्या. नेतृत्वाबरोबरच वक्तृत्वाची छाप त्यांनी जनतेच्या मनावर पाडली आहे. सध्या त्या जिल्हा नियोजन समितीच्या सदस्या आहेत.

निलीमा पाटील या माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नी असून मागच्या काळात त्यांनी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. ग्रामीण भागात महिलांचे प्रश्न सोडविणे त्यांना न्याय मिळवून देणे, आदिवासी बांधवासाठी खऱ्या अर्थाने काम करीत आहेत.

पेण मतदार संघात आमदार रविशेठ पाटील व माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व असून त्याचा प्रत्यय खासदारकीच्या निवडणुकीत नक्कीच आला असून माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या नेतृत्वाखाली या मतदार संघात महिलाराज नक्की येईल, असे चित्र सध्या दिसून येत आहे.

# मयूर दिवेकर यांनी स्वखर्चातून भरले अष्टमी येथील खड्डे

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नागोठणे रोडवरील अष्टमी येथे ब्लड बँकेसमोर भला मोठा खड्डा गेल्या अनेक दिवसापासून पडला होता. यामुळे वाहनचालकांना आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या खड्ड्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असल्यामुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली होती,



परंतु रोह्यातील माजी नगरसेवक मयूर दिवेकर यांनी ही परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या स्वखर्चातून त्वरित खड्डे बुजवले. रोहेकर नागरिकांनी मयूर दिवेकर यांचे या कामाबद्दल सर्वत्र कौतुक केले आहे. त्यांच्या त्वरित कारवाईमुळे नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित झाली आहे. दिवेकर यांच्या कर्तव्यदक्षतेमुळे प्रशासनाने दुर्लक्ष केलेल्या समस्येचे निराकरण झाले आहे, आणि नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# अमली पदार्थ सेवनविरोधी दिनानिमित्त वडगाव शाळेत प्रभातफेरी

**खोपोली : प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती व जागतिक अमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्ताने खालापूर तालुक्यातील वडगाव शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रभात फेरी,पोस्टर रंगविणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुलांना रोख स्वरूपात बक्षिसे व वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा करुणा ठोंबरे, उपाध्यक्षा राजश्री जांभुळकर, मुख्याध्यापक सुभाष राठोड, शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थान समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन वैजनाथ जाधव यांनी केले तर प्रास्ताविक व आभार सुभाष राठोड यांनी केले.




कार्यक्रमासाठी विषय शिक्षिका सरस्वती कवाद, स्वयंसेविका साक्षी, निकिता, भाग्यश्री, आकांक्षा व माजी विद्यार्थी ऋषिकेश जाधव, श्रुतिका जांभुळकर यांनी सहकार्य केले.

# केएमसी महाविद्यालयात पीएचडी संशोधन केंद्रास मुंबई विद्यापीठाची मान्यता

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के.एम.सी महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागास पीएचडी संशोधन केंद्राची मुंबई विद्यापीठाकडून मान्यता मिळाली आहे.

सन १९७९ साली तत्कालीन राज्यमंत्री कै.बी.एल. पाटीलसाहेब यांच्या प्रेरणेने व नगर परिषदेच्या सहकार्याने ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे, या हेतूने महाविद्यालयाची स्थापना झाली. गेल्या ४५ वर्षात महाविद्यालयाने सर्वच क्षेत्रात नावलौकिक संपादन केला असून रायगड जिल्ह्यातील एक नामांकित महाविद्यालय म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणापासून आता संशोधनपर अभ्यासाची सुविधा महाविद्यालयात उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना वाणिज्य विषयात पीएचडीचे संशोधन केएमसी महाविद्यालयातून करता येणार आहे.



वाणिज्य विभागात पीएच.डी. संशोधन केंद्र सुरू होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करत केजी टू पीजीपर्यंतचे सर्व शिक्षणक्रम संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या सुविधेचा लाभ घ्यावा, अशी भावना संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम व कार्यवाह किशोर पाटील यांनी व्यक्त केली. वाणिज्य विभागातील पीएचडी संशोधन केंद्राच्या मान्यतेबद्दल संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूभाई जळगावकर, कार्यवाह किशोर पाटील, संस्थेचे माजी अध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, महाविद्यालय विकास समितीचे उपाध्यक्ष दिलीप पोरवाल, माजी उपाध्यक्ष राजेश अभाणी, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी प्राचार्य डॉ. प्रताप पाटील आणि वाणिज्य विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक डॉ. विनायक गांदल यांचे अभिनंदन व कौतुक केले.

महाविद्यालयाच्या वाणिज्य विषयात पीएच.डी संशोधनाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला असून याबद्दल संस्थेचे, महाविद्यालयाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. संशोधन केंद्राच्या मान्यतेसाठी संस्थेचे सर्व संचालक, पदाधिकारी व सदस्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व आवश्यक त्या सहकार्याबद्दल प्राचार्य, डॉ.प्रताप पाटील यांनी सर्वांचे आभार मानले आहेत. महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम., एम.कॉम.,एम एस्सी. पीएच.डी.,(रसायनशास्त्र,) पीएच.डी.(कॉमर्स) हे शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. पीएच.डी. प्रवेशासाठीची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून पात्र विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रवेशासाठी महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नागोठण्यातील जगदीश झोरेच्या लैला मजनू गाण्याने रसिकांना भुरळ

**नागोठणे : बातमीदार**

बिग हिट मीडिया ने आजवर अनेक हिट गाणी सिनेरसिकांच्या मनोरंजनासाठी आणली आहेत. या गाण्यांच्या यादीत भर घालत 'लैला मजनू' हे नवकोर रोमँटिक गाणे प्रेक्षकांच्या भेटीस आले आहे. या गाण्यात नागोठणे जवळील चिकणी या छोट्याशा गावातील अभिनेता सामाजिक कार्यकर्ते यशवंत झोरे यांचा सुपुत्र जगदीश झोरे आणि अभिनेत्री तनु भोसले यांच्यातील बहरणारे प्रेम पाहणे लक्षवेधी ठरत असून लैला मजनू या गाण्याने रसिकांना भुरळ घातली आहे.

जगदीश झोरे या अभिनेत्याचे नागोठणे पंचक्रोशीत कौतुक करून त्याला त्याच्या पुढील यशासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. दरम्यान, मी माझे करिअर सिने श्रेतात घडविणार असून त्यासाठी कितीही कष्ट करायला लागले तरी चालतील, परंतु सिने क्षेत्रात मी निश्चितच यशस्वी होईन, असा आत्मविश्वास अभिनेता जगदीश झोरे याने व्यक्त केला.

'लैला मजनू' या रोमँटिक गाण्यातूनसमोर आलेले हे प्रेमीयुगुल साऱ्यांना वेड लावत आहे. गाण्याच्या थिरकायला लावणाऱ्या अशा बोलांनी आणि गाण्याच्या हटके चालीने साऱ्यांना भुरळ घातली आहे. 'बिग हिट मीडिया'ने आजवर अनेक हिट गाणी सिनेरसिकांच्या मनोरंजनासाठी आणली आहेत. या गाण्यात अभिनेता जगदीश झोरे आणि अभिनेत्री तनु भोसले यांच्यातील बहरणारे प्रेम पाहणे लक्षवेधी ठरत आहे.

प्रशांतने हे गाणे गायले असून सोनाली सोनावणेने तिच्या आवाजाची जोड दिली आहे. तर संपूर्ण गाण्याच्या दिग्दर्शनाची धुरा रोहित जाधवने सांभाळली आहे. गाणे प्रदर्शित होऊन चार ते पाच दिवस झाले असून हे गाणे रसिक प्रेक्षकांच्या पसंतीस पडले आहे. अनेकजण या गाण्याला पसंती दर्शविताना दिसत आहेत.



# डॉ. विश्वास चव्हाण सेवानिवृत्त

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण यांचा सेवापूर्ती कार्यक्रम झाला. या वेळी त्यांना कोकण उन्नत्ती मित्र मंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

व्यासपीठावर कोकण उन्नती मित्र मंडळाचे विश्वस्त सचिव अशोक तळवटकर, सुभाष महाडिक, इस्माईल घोले, मनोज भगत, अजित कासार, आदेश दांडेकर, फजल हलडे, अब्दुल घनसार, प्राचार्य साजिद शेख, रियाज ढाकम, नाना गुरव, वासंती उमरोटकर आदी उपस्थित होते.



**नावात बदल**

मी शंभूकुमार ओझा Qtr No.D/296/04 नेव्ही नगर करंजा, ता-उरण जिल्हा -रायगड पिन-४००७०४ यांची शिवांगी मुलगी आहे.आधार कार्ड, जन्म प्रमाणपत्र, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एम-२४८७९५९ नुसार मी माझे नाव शिवांगी पासून शिवांगी ओझा असे बदलले आहे.

# नवी मुंबईत स्वच्छताविषयक उपक्रमांवर भर

## महामार्गांवर लोकसहभागातून सखोल मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

महामार्गांवर नेहमीच वाहनांची वर्दळ सुरू असते. त्यामध्ये बांधकाम साहित्याचीही मोठया प्रमाणावर वाहतूक होते. या वाहतूकीमध्ये रस्त्यावर पडणाऱ्या रेतीचे धूळीत रुपांतर होऊन प्रदूषणात वाढ होते तसेच नियमीत वाहतूक सुरू असल्याने महामार्गांची सखोल स्वच्छता करण्यास मर्यादा येतात. त्या अनुषंगाने महामार्गांच्या स्वच्छतेवर अधिक लक्ष देण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महामार्गांवर लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली असून यामुळे प्रदूषण कमी होईल शिवाय नागरिकांच्या आरोग्यातही सुधारणा होईल असा विश्वास नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी व्यक्त केला.



### ७० गोणी सुका कचरा गोळा

या सखोल स्वच्छता मोहीमेत व्यापक लोकसहभागाच्या आयुक्तांनी केलेल्या आवाहनास अनुसरुन ऐरोली ज्येष्ठ नागरिक संघ, संत निरंकारी महाराज सेवा मंडळ, सेवानिवृत्त पोलीस संघ, सुशिलदेवी देशमुख विदयालयाचे एनएसएस विद्यार्थी युनिट व सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी प्लास्टिक बाटल्या, रॅपर्स, कागद अशा स्वरुपाचा ७० गोणी सुका कचरा गोळा करण्यात आला.

'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत ठाणे – बेलापूर महामार्गावर ऐरोली रेल्वे स्टेशनपासून दिघा तलावापर्यंत 'सखोल स्वच्छता मोहीम' राबविण्यात आली. यामध्ये महापालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छतामित्र यांच्या समवेत ऐरोली व दिघा भागातील विविध स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, नागरिक व एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी उत्साही सहभाग घेतला.

नवी मुंबई हे राज्यातील सर्वांत स्वच्छ शहराचा बहुमान प्राप्त केलेले देशातील द्वितीय क्रमांकाचे स्वच्छ शहर असून स्वच्छता ही कायम करण्याची गोष्ट असल्याने पावसाळ्यातही मोहीम राबविण्यात येत असल्याचे आयुक्तांनी सांगितले. यादृष्टीने शनिवारी सायन–पनवेल महामार्गावर सखोल स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली व ठाणे–बेलापूर महामार्गावर मोहीम राबविण्यात आली.

नागरिकांच्या सहभागाशिवाय कोणतीही मोहीम यशस्वी होऊ शकत नाही, त्यातही नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असणारी स्वच्छतेसारखी बाब त्यांच्या नियमीत सवयीतूनच यशस्वी होईल हे लक्षात घेत नागरिकांनी घरातूनच कचऱ्याचे दैनंदिन वर्गीकरण करावे तसेच आपल्या घराप्रमाणेच आपला परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले.

यादृष्टीने स्वच्छतेसाठी सोसायटयांना प्रोत्साहीत करण्याकरीता 'स्वच्छ सोसायटी स्पर्धा' घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे मोठया सोसायटीतील ओल्या कचऱ्याची नाविन्यपूर्ण रितीने विल्हेवाट लावणारे प्रकल्प राबविणाऱ्या सोसायटयांसाठीही स्पर्धा आयोजित केली जाणार असल्याची माहिती दिली. याशिवाय प्रत्येक सोसायटीने आपला अंतर्गत परिसर स्वच्छ राखण्यासोबतच आसपासचा रस्ताही स्वच्छतेसाठी दत्तक घ्यावा व शहर स्वच्छतेत आपले अनमोल योगदान द्यावे, असेही आवाहन आयुक्तांनी केले.

ऐरोली रेल्वे स्टेशन परिसरात अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्यासह सर्व उपस्थितांनी स्वच्छतेची व पर्यावरण संरक्षणाची सामुहिक शपथ घेऊन सखोल स्वच्छता अभियानाला सुरुवात झाली. यामध्ये नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे स्वत: सहभागी झाले व त्यांच्या समवेत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १चे उपायुक्त सोमनाथ पोटरे, परिमंडळ २चे उपायुक्त तथा दिघा विभाग अधिकारी डॉ. कैलास गायकवाड, समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, ऐरोली विभागाचे विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त अशोक अहिरे, सहा. आयुक्त शशिकांत तांडेल, सुनील काठोळे, संजय तायडे, कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे व मनोहर सोनावणे, मुख्य स्वच्छता अधिकारी सतीश सनदी, उप मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे आणि इतर अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता मित्र, विविध स्वयंसेवी संस्था व मंडळे यांचे पदाधिकारी व नागरिक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सक्रीय सहभाग घेतला.

अशा प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहीमा मुख्य मार्गांवर नियमीतपणे राबविल्या जाणार असून स्वच्छतेबाबत कोणत्याही प्रकारची दिरंगाई आढळल्यास सक्त कारवाई करण्यात येईल, असे आयुक्तांनी निर्देशित केले.

## स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत दिवाळे कोळीवाडा चकाचक

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत स्वच्छ परिसर, स्वच्छ गाव, स्वच्छ सुरक्षित सागर ही विशेष मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमात उत्साहाने सहभागी होत. नवी मुंबई महापालिकेच्या बेलापूर विभाग क्षेत्रामधील 'स्मार्ट व्हिलेज' दिवाळे कोळीवाड्यातील स्थानिक ग्रामस्थ तसेच ज्येष्ठ नागरिक संस्था व एस के कॉलेज सायन्स अँड कॉमर्स नेरूळमधील विद्यार्थ्यांसह शिक्षक वर्गाने शनिवार (दि. २९) संपूर्ण दिवाळे कोळीवाडा आणि खाडीकिनाऱ्याची साफसफाई केली.



या वेळी, पावसाच्या दिवसात मोठ्या प्रमाणात पानवेली वाहत आल्याने समुद्रकिनारी चिखल आणि कचरा जमा होतो. त्यामुळे सर्वानी एकजुटीने सहभागी होऊन या उपक्रमाअंतर्गत वाढत्या प्रदूषणाशी लढा देत 'माझा कचरा, माझी जबाबदारी ही ओळ केवळ घोषवाक्यापुरती मर्यादित न ठेवता बेलापूर विभाग कार्यक्षेत्रातील नागरिकांनी पुढाकार घेत तेथील स्वच्छताकर्मीच्या दैनदिन कामाचा सन्मान करण्यासाठी त्यांना सुट्टी दिली आणि स्वतः झाडूसह इतर स्वच्छता साधने हातात घेत खाडी किनाऱ्यासह रस्ते, गल्ल्यांची साफसफाई करून ५० गोणी कचरा गोळा केला.

दरम्यान, या स्वच्छ सागर, सुरक्षित सागर या मोहिमेअंतर्गत ग्रामस्थांनी मुलाबाळांसह हातात झाडू, घमेला, फावडा घेऊन स्वच्छता मोहीम हाती घेत परिसराची साफसफाई करून स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशानुसार आणि नवी मुंबई महापालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार आणि उपायुक्त डॉ.अजय गडदे यांच्या संकल्पनेतून खाडी परिसरात 'स्वच्छ सर्वेक्षण' अभियानांतर्गत सागरी किनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यानुसार खारीचा वाटा म्हणून दिवाळे कोळीवाड्यातील ग्रामस्थांनी स्वतःहून पुढाकार घेत साफसफाई केली.

विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग, महिला भगिनी या सर्वांनी उपक्रमाला भरीव योगदान देऊन गावाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला गतीही दिली. या वेळी बेलापूर विभागात सफाई करण्यासाठी २०० हून अधिक नागरिकांच्या सहभागाने जणू बेलापूर विभागात स्वच्छतेची व्यापक चळवळच उभी राहिली.

### स्वच्छता अंगीकारूया, आजारपण पळवूया!

दरम्यान, पावसाळ्यात शहर स्वच्छ राहावे, नागरिकांच्या आरोग्याचेही रक्षण करता यावे यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने नुकताच कृती आराखडा तयार केला आहे. १ जुलै ते ३१ ऑगस्टपर्यंत 'स्वच्छता अंगीकारूया, आजारपण पळवूया' हे विशेष अभियान राबविले जाणार आहे. दुर्लक्षित विभागांची या अभियानादरम्यान स्वच्छता केली जाणार आहे.

## नेरूळच्या फकिरा मार्केटमध्ये साफसफाई; अनेकांचा सहभाग



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत विविध ठिकाणी स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत. अशाच प्रकारची विशेष स्वच्छता मोहीम नेरूळ सेक्टर १५ येथील फकिरा मार्केटमध्ये सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे व स्वच्छता अधिकारी दिनेश वाघुळदे यांच्या माध्यमातून राबविण्यात आली.

या मोहीमेमध्ये महापालिका अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता निरीक्षकांसमवेत मार्केटमधील व्यापारी व नागरिकही मोठ्या संख्येने सहभागी झाले. या वेळी स्वच्छतेविषयीची सामुहिक शपथ घेण्यात आली तसेच प्रतिबंधात्मक एकल वापर प्लास्टिकचा व प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे बंद करणेविषयी आवाहन करण्यात आले. मार्केटची अंतर्गत तसेच बाह्य परिसर सफाई करण्यात आली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे अभिप्राय प्रणालीवर पेटेंट प्रसिद्ध

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाचे १९७०च्या पेटेंट कायद्यानुसार अभिप्राय प्रणालीवर पेटेंट कार्यालयाच्या शासकीय मासिकामध्ये २१ जून रोजी पेटेंट प्रसिद्ध झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व अकाउंट व फायनान्स विभागातील प्रा. योगिता पाटील तसेच प्रा. नमित भटनागर सहाय्यक प्राध्यापक उत्तराखंड या सर्वांनी १८ जून रोजी पेटेंट प्रसिद्ध करण्यासाठी कार्यालाकडे अर्ज केला होता. कार्यालयाने त्यांच्या अर्जाची छाननी करून २१ जून रोजी कार्यालयाच्या मासिकामध्ये अभिप्राय प्रणालीवर पेटेंट प्रसिद्ध केले. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करताना या अभिप्राय प्रणालीचा वापर हा परिणात्मक केला जाईल त्यामध्ये अभिप्राय कलेक्शन, वर्गीकरण, शैक्षणिक परिणामकता, विद्यार्थ्यांची समाधानकारकता या सर्व घटकांमुळे अध्ययन व अध्यापनामध्ये सतत बदल दिसून येतील.



संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी संचालक परेश ठाकूर, संस्थेचे सचिव एस.टी. गडदे या सर्वांनी अभिप्राय प्रणालीवर पेटेंट प्रसिद्ध झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व प्रा. योगिता पाटील यांचे अभिनंदन केले.

## नवी मुंबईतील रिक्षाचालकांचे प्रश्न लवकरच मार्गी लावू

### परिवहन सचिवांचे नाहटा यांना आश्वासन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या समवेत, विरोधी पक्ष नेते दिलीप घोडेकर, भरत नाईक, दिलीप आमले, मारुती कोंडे आणि नवी मुंबईतील विविध १८ रिक्षाचालकमालक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने रिक्षाचालकांच्या विविध समस्यांबाबत परिवहनचे प्रधान सचिव संजय सेठी (आयएएस) यांची मंत्रालयात भेट घेतली. या भेटीत रिक्षाचालकांच्या विविध समस्या शेठी यांनी जाणून घेऊन त्या सोडवण्याचे आश्वासन या वेळी विजय नाहटा यांच्या समवेत आलेल्या नवी मुंबईतील रिक्षाचालक आणि मालकांना दिले.

या भेटी दरम्यान रिक्षा पासिंग विलंब झाल्यास प्रतिदिन ५० रुपये दंड ठोठावण्यात येतो. दंडाची रक्कम बरीच मोठी असल्यामुळे दंडाची रक्कम माफ करावी वा ती कमी करावी, रक्कम भरण्यास मुदत वाढ देण्यात यावी. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केल्याप्रमाणे रिक्षा टॅक्सी चालकाचे महामंडळ तात्काळ गठित करण्यात यावे, २५ हजार पेक्षा जास्त अधिकृत आणि अनधिकृत रिक्षा नवी मुंबईत आहेत. त्यामुळे व्यवसाय मिळत नाही. अशा परिस्थितीत नवीन परवाने पुढील तीन वर्षे बंद करण्यात यावेत. यासोबत अन्य विविध मागण्यांवर चर्चा सविस्तर झाली.



बैठकीदरम्यान परिवहन विभागाचे प्रधान सचिव सचिव संजय सेठी (आयएएस) यांनी सांगितले की, दंडाच्या रकमेबाबत त्वरित मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून मुदत वाढ देण्यात येईल. रिक्षा टॅक्सी चालकांचे महामंडळ गठित झाले आहे. शासन निर्णय निर्गमित झाला असून ५० कोटी रुपये महामंडळास वर्ग करण्यात आले आहेत. कार्यपद्धतीचे नियम बनविण्यात येत असून आठ दिवसांत अंतिम स्वरूप देण्यात येईल. कार्यपद्धतीबाबत काहीही सूचना असल्यास त्या त्वरित परिवहन विभागास देणे बाबतची तरतूद सुचविण्यात येईल, असे परिवहन सचिव संजय सेठी यांनी विजय नाहटा यांना सांगितले. नवीन रिक्षा परवाने बंद करण्याबाबत धोरणात्मक निर्णय असून लवकरच संबधित सर्व विभागांशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन परिवहन सचिव यांनी दिले.

प्रथमच रिक्षाचालकांच्या समस्येबाबत विजय नाहटा यांनी मंत्रालयात तातडीची बैठक आयोजित करून सकारात्मक आणि निर्णायक चर्चा घडवून आणल्याबद्दल रिक्षा चालकांच्या संघटना प्रतिनिधींनी दिलीप घोडेकर, भरत नाईक, दिलीप आमले, मारुती कोंडे यांनी विजय नाहटा यांचे आभार मानले. या वेळी नवी मुंबईतील विविध रिक्षा संघटनाचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

## भाजपतर्फे नेरूळमध्ये गुणवतांचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पक्ष प्रभाग क्रमांक–९६/९७ इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थी घरोघरी जाऊन सत्कार करण्याचे अभियान गुरुवार (दि. २७)पासून सुरू झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांचा घरोघरी सत्कार करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा देताना त्यांच्या पालकांचेही भाजपच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

भाजप प्रभाग क्रमांक–९६/९७ तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रभागातील इयत्ता दहावी व बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा घरोघरी जाऊन सत्कार करण्यास सुरुवात झाली. गुरुवारी नेरूळ सेक्टर १६मधील सर्व विद्यार्थ्यांचा घरोघरी जाऊन सत्कार करण्यात आला,



या वेळी नवी मुंबई भाजप चिटणीस गणेशदादा भगत, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष राजू तिकोणे, सामाजिक कार्यकर्त्या उल्का राजू तिकोणे, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप कल्शेट्टी, अशोक गांडाळ, विकास तिकोणे, सागर मोहिते, रवींद्र भगत, शशिकांत जगताप, मनोहर कातूर्ड, मयूर पवार, शुभम मोरे, सचिन दिघे, अरविंद इंगवले, अक्षय शिरगांवकर, निशांत चिखले, विद्याधर मोरे उपस्थित होते.

## प्रभात ट्रस्टतर्फे मोफत डे केअर सेंटर नोंदणी सुरू

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राजश्री शाहू महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रभात ट्रस्टच्या वतीने चालू होत असलेल्या आर्थिक दुर्बल घटकाच्या मुलासाठी मोफत डे केअर सेंटरमध्ये नोंदणी सुरू करून सामाजिक न्यायाचे नवे पर्व सुरू करण्यात येणार असल्याचे प्रभात ट्रस्टचे अध्यक्ष व नेत्र रोग तज्ञ डॉ. प्रशांत थोरात यांनी सांगितले.

विशेष म्हणजे घणसोली येथे प्रथमच मोफत डे केअर सेंटर सुरू होत असून विशिष्ट घटकांसाठी असलेले हे सेंटर घणसोली येथील नवी मुंबई महापालिकेच्या समाज मंदिरात सुरू होणार आहे. कामावर जाताना मुलांना एकटे घरी ठेवल्यास दूरचित्रवाणी, मोबाईलचा अमर्याद वापर होत आहे. शेजारी, नातलग किंवा परिचितांकडे ठेवावे तर अजाणत्या वयातच ही मुले अत्याचाराला बळी पडतात हे पाहिले आहे.

नोकरदार परिवाराला आपल्या मुलांना डे केअर सेंटरमध्ये ठेवणे आर्थिकदृष्ट्या शक्य आहे, मात्र ज्यांची महिन्याची कमाईच पाच–सात हजार रुपये, अशी तुटपुंजी आहे, अशा दैनंदिन रोजंदारी कामगार, घरकाम करणाऱ्या महिला व मोलकरणी यांच्यासाठी हे केवळ अशक्य आहे, म्हणून मोफत डे केअर सेंटरची कल्पना सुचली असून गरजू पालकांनी ९७६९४३२२२४ या मोबाईल क्रमांक वर संपर्क साधावा, असे आवाहन प्रभात ट्रस्टच्या डॉ. आश्लेषा थोरात यांनी सांगितले.

## डीपीएस फ्लेमिंगो तलाव मनपाला हस्तांतरित करा –आमदार गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमहीदार**

एकरचा डीपीएस फ्लेमिंगो तलाव नवी मुंबई महापालिकेकडे (एनएमएमसी) मिळवून देण्यासाठी पर्यावरणवाद्यांच्या मोहिमेला आमदार गणेश नाईक यांनी पाठिंबा दिला. त्यांनी डीपीएस फ्लेमिंगो तलाव मनपाला हस्तांतरीत करा, अशी मागणी केली आहे.



नेरूळ जेट्टीकडे जाण्यासाठी रस्ता तयार करताना भरतीच्या पाण्याचा प्रवाह रोखल्यामुळे जलवाहिनी कोरडी पडल्यानंतर फ्लेमिंगोच्या मृत्यूची राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) प्रमुख खंडपीठाने स्वत:हून दखल घेतल्याने हा तलाव अलीकडेच चर्चेत आला होता. सिडकोने केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय आणि राज्याच्या वन विभागाने नेरूळ जेट्टीचा बांधकाम करताना भरतीच्या पाण्याच्या मुक्त प्रवाहात अडथळा आणू नये म्हणून घातलेल्या अटींचे उल्लंघन केले आहे.

सिडकोनेच वनसंवर्धन कायद्यांतर्गत पाण्याच्या प्रवाहावर परिणाम होणार नाही, असे हमीपत्र दिले असले तरी तलावाच्या दक्षिणेकडील मुख्य जलवाहिनी बंद करण्यात आली होती, याला वनविभागाच्या पाहणीतून पुष्टी झाली आहे, असे नॅटकनेक्ट फाऊंडेशन संचालक बी.एन. कुमार यांनी सांगितले.

नाईक यांच्या सूचनेनुसार, मनपा अधिकाऱ्यांनी दोन वॉटर चोक पॉइंट्स साफ केले त्यानंतर सिडकोने मनपा विरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल केली. सिडकोने तलावाच्या आजूबाजूला 'प्लॉट' वर अतिक्रमण केल्यास कारवाई केली जाईल, असे फलक लावले आहेत. जैवविविधता समृद्ध डीपीएस फ्लेमिंगो तलावाचे व्यापारीकरण करण्याचा हा सिडकोचा डाव आहे, असे कुमार यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केल्याचे सांगितले आणि सरोवर संवर्धन आणि देखभालीसाठी पालिकेकडे सोपवण्याची विनंतीदेखील केली. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी हा मुद्दा नगरविकास विभागाकडे पाठवला आहे.

कुमार म्हणाले, आम्ही मुख्यमंत्र्यांच्या मेलवर कारवाईची स्थिती जाणून घेण्यासाठी माहिती अधिकार (आरटीआय) कायद्यांतर्गत आमच्या अर्जावर सरकारकडून प्रतिसादाची वाट पाहत आहोत. सिडकोने पालिकेकडे २५ तलाव हस्तांतरित केले आहेत, पण डीपीएस फ्लेमिंगो तलाव आणि एनआरआय आणि टीएस चाणक्य पाणथळ जमिनीवर सिडकोचा नियंत्रण आहे.

दरम्यान, कुमार यांनी नाईक यांच्याशी पर्यावरणाच्या अनेक मुद्द्यांवर चर्चा केली आणि सिडकोकडून होत असलेल्या उल्लंघनाचा मुद्दा उपस्थित केला. डीपीएस फ्लेमिंगो सरोवर संवर्धन आणि देखभालीसाठी पालिकेकडे सुपूर्द करणे आवश्यक असल्याचे नाईक यांनी मान्य केले. तलाव वाचवण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल पर्यावरण आणि नागरिकांच्या गटांचे कौतुक करून नाईक म्हणाले की, ते सरकारमध्ये योग्य ती भूमिका मांडतील.

# ‘मागास आदिवासी समाजापर्यंत शासनाचे विविध लाभ पोहचणे गरजेचे’



**रायगड : रामप्रहर वृत्त**

डोंगराळ दुर्गम भागात राहणारे मागास आदिवासी समाजापर्यंत रोजगार, शिक्षण, आरोग्य यासह शासनाचे विविध लाभ पोहचणे गरजेचे आहेत. आदिवासी व्यक्तींना आधारकार्ड, जन्मदाखले, रेशनकार्ड सहजतेने मिळावे यासाठी प्रक्रियेतील अडचणी प्रशासनाने दूर कराव्यात असे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम ए. सय्यद यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग दोन दिवसीय जिल्हा दौऱ्यावर असून जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी किशन जावळे, आयोगाचे सचिव नितीन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, प्रमुख शासकीय अधिकारी,विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सय्यद म्हणाले, वेठबिगारी (बॉडेड लेबर)सारख्या अनिष्ट मार्गावर व्यक्तीस जायला लागू नये अशा बाबी समूळ नष्ट करण्यासाठी आयोग प्रयत्नशील आहे. याबाबत पाहणी व माहिती घेण्यासाठी राज्यात रायगड जिल्ह्यात या दौऱ्याद्वारे प्रथमच जाणून घेतले जात आहे. कातकरी आदिवासींची पाहणी, स्वयंसेवी संस्था यांच्याकडून माहिती घेतली जात आहे. टाटा इन्स्टिट्यूट कडून यासाठी सहकार्य घेतले आहे. आर्थिक कारणांमुळे मागास आदिवासी समाज या चक्रात अडकू शकतो. आरोग्य, शिक्षण, घर, विवाह या कारणांनी निकडीची स्थिती येते. शासन यंत्रणेद्वारे त्यांना लाभ दिले जावेत. अशिक्षित मागास आदिवासी व्यक्तींकडे रेशन कार्ड, आधार कार्ड, जन्मदाखले नसल्याने देखील ते हतबल होतात, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी जावळे यांनी आधार कार्ड सहजगत्या दिले जावे, यासाठीच्या शिबिरातून तांत्रिक व अडचणीमुळे काम थांबू नये यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील, तसेच जिल्हास्तरावर उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन हे नोडल अधिकारी नेमले असून स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी त्यांना थेट संपर्क करून मदत घेऊ शकतात. आधार नोंदणी साठी शुल्क देखील देता येत नाही अशा आदिवासींचे शुल्कसाठी नाविन्यपूर्ण योजनेतून निधी उपलब्ध करून देऊ, असे ते म्हणाले.

आयोगाचे सचिव नितीन पाटील यांनी मानवी हक्क आयोगाच्या दौऱ्याचा उद्देश तसेच आयोगा समोरील कामकाजाबाबतची माहिती दिली. आधार कार्डसारख्या मूलभूत बाबी मिळण्यातील येणाऱ्या अडचणींबाबत सांगितले. जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांनी, जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांमध्ये येणाऱ्या नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधाची माहिती दिली. पोलीस विभागाने काळानुरूप सुधारणा करताना अनेक बदल केले आहेत, असे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ बास्टेवाड यांनी, जन्म दाखले व वय निश्चितीसाठी स्वयंसेवी संस्थांसोबत च्या शिबिरांमध्ये पुरेसे वैद्यकीय अधिकारी नेमणे, शालेय प्रवेश दाखल्यांवर अडचणी दूर करणे बाबत उपाययोजनांसाठी माहिती दिली.

## खालापूर तहसीलदारांकडून मोरबे येथील उपोषणकर्त्यांची भेट

### वरिष्ठांशी चर्चा करण्याचे आश्वासन

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूरचे नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी मोरबे धरणावर सुरू असलेल्या आंदोलन करणाऱ्यांची भेट घेऊन विचारपूस केली.

खालापूर तालुक्यातील मोरबे धरणामुळे बाधीत झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांसाठी मोरबे धरण कृती समितीच्या वतीने धरणे आंदोलन मोरबे धरणावर सुरू आहे. या आंदोलनाच्या शुक्रवारी दुसऱ्या दिवशी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी मोरबे धरणावर जाऊन उपोषणकर्त्यांची भेट घेतली. या वेळी त्यांनी उपोषण मागे घेण्याची विनंती करून आपले निवेदन राज्य सरकारला पाठवल्याचे उपोषणकर्त्यांना सांगितले. निवेदनात असलेले मुद्दे राज्य शासनाच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे लवकरच वरिष्ठांशी चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन नायब तहसीलदार राठोड यांनी दिले. आंदोलकांना शासनाकडून लेखी आश्वासन हवे आहे.



## माणगावजवळ झाड कोसळल्याने महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम



**माणगाव : प्रतिनिधी**

जोरदार पावसामुळे शुक्रवारी (दि. २८) सायंकाळी ४च्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावर माणगावजवळ अचानक एक झाड कोसळले. त्यामुळे महामार्गावर माणगाव व इंदापूर या दोन्ही बाजूंच्या दिशेने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

झाड पडले त्या वेळी महामार्गावरून वाहन जात नसल्याने सुदैवाने अनर्थ टळला, पण झाड कोसळल्याने वाहतूक कोंडी झाली. याची माहिती मिळताच माणगाव वाहतूक पोलीस व पोलीस ठाणे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. हे झाड बाजूला करण्यासाठी कटर, जेसीबी, मशीन, दोन मागविण्यात आल्या.

दीड ते पावणेदोन तासांनंतर झाड बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत सुरू करण्यात यश आले.



## शिक्षक पालक संघ सभा

**मुरुड : प्रतिनिधी**

हिंदु एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदिर मुरुड येथे शिक्षक पालक संघाची सभा ट्रस्टी दिपाली जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या सभेस सचिव सुनील विरकुड, कार्यकारिणी सदस्य मनीषा फाटक, उषा खोत, मुख्याध्यापिका प्रविता गार्डी आदी उपस्थित होते.

या वेळी शिक्षक पालक संघात उपाध्यक्ष म्हणून सागर राऊत, तर सहसचिव म्हणून वैष्णवी गायकर यांची निवड करण्यात आली. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत वर्गनिहाय पालक प्रतिनिधीही निवडण्यात आले. सभेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रेया माळी यांनी व्यक्त केले.

## कर्जत पोलीस ठाण्यास २४ बॅरिकेड्स भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ देवनार मुंबई यांच्याकडून कर्जत पोलीस ठाण्यास २४ बॅरिकेड्स भेट देण्यात आले आहेत.

रोटरी क्लब ऑफ देवणार मुंबईचे अध्यक्ष अजित पप्पू, उपाध्यक्ष संगीता शहाणी, सुरेंद्रनाथ, शोभा लईर, पद्मा कपूर, निखिल गुजर, अर्जुन तरे, अरुण मसणे यांनी कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्याकडे बॅरिकेड्स सुपूर्द केले. या वेळी ठाणे अंमलदार, कर्मचारी उपस्थित होते.




## वावर्ले येथे व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक अमली पदार्थविरोधी दिनानिमित्ताने भूमिका फाऊंडेशन यांच्या वतीने वावर्ले येथे व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम पार पडला. छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रम घेण्यात आला. भूमिका फाऊंडेशनचे अध्यक्ष मानसशास्त्रज्ञ डॉ. विशाल गाणार यांनी व्यसन म्हणजे काय? त्याचे दुष्परिणाम आणि उपाय या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.



कोणतेही व्यसन हे मानसिक आजारचे लक्षण असते, तंबाखू, गुटखा, दारू, ड्राग्ज या अमली पदार्थांच्या सेवनाने जो व्यसन करतो त्याच्या शरीराची हानी तर होतेच, परंतु घरातील एक व्यसनी व्यक्तीमुळे पूर्ण कुटुंबाची ही हानी होते, आजचे तरुण-तरुणी वेगवेगळ्या व्यसनाच्या आहारी जात असल्याचे दिसून येते, अती मोबाईलचा वापर करणे, दिवसातून सहा सेफी घेणे हेदेखील मानसिक आजाराचे लक्षण आल्याचे त्यांनी सांगितले.

ज्या तरुणाच्या हाती उद्या देशाची सूत्रे जाणार आहेत ते तरुणच व्यसनाच्या आहारी जात असल्याने खंत व्यक्त केली आणि सर्व विद्यार्थांना व्यसनापासून दूर राहण्याची विनंती केली. शेवटी सर्व विद्यार्थांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी भूमिका फाऊंडेशनच्या वतीने नशामुक्तीची शपथ राम मस्के यांनी दिली. ही शपथ घेणाऱ्यांची सही, घेण्यात आली नशा मुक्तीची शपथ घेणे आणि देणे याची चळवळ उभी राहील यात शंका नाही.

या कार्यक्रमास बाल कल्याण समिती रायगड अध्यक्ष जगन्नाथ साळुंके, सदस्य राम मस्के, सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र गायकवाड शाळेचे मुख्याध्यापक शिंदे, इयत्ता अकरावी व बारावीचे विद्यार्थी पालक व शिक्षक उपस्थित होते.

## अदानी फाउंडेशनकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी कुटुंबाच्या आणि समाजाच्या ऋणाची जाणीव ठेवावी. ज्या मातीतून तुम्हाला संस्कार मिळतात, त्यावर तुमचे पालनपोषण होते. म्हणून त्या मातीला तुम्ही विसरू नका, असे आवाहन दिघी पोर्ट लि.चे मरीन विभाग प्रमुख कॅप्टन राघवेंद्र राघव यांनी काढले. अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लि.च्या माध्यमातून आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. दिघी येथील अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले हायस्कूलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला शाळेचे सभापती अनंत मेंदडकर, कार्यकारी सलील अंतुले, मुख्याध्यापक उत्तम वाणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सचिन मापुस्कर, कुडगाव ग्रामपंचायत सरपंच प्रमिला मेंदडकर, दिघी पोर्ट लि.चे कर्नल चंदरदेव संब्याल, अदानी फाउंडेशन डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर जयश्री काळे आणि शिक्षक उपस्थित होते.



जयश्री काळे यांनी प्रास्ताविकात अदानी फाउंडेशन माध्यमातुन राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक विकास उपक्रमांची माहिती दिली. भविष्यात दिघी पोर्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपसुद्धा देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

कॅप्टन राघवेंद्र राघव यांनी मरीन क्षेत्रात उपलब्ध संधींबद्दल माहिती देऊन आलेली संधी दवडू नका, असे सांगितले. कर्नल चंदरदेव सांब्याल यांनी आर्मी क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या नवनवीन संधींबद्दल माहिती देऊन आता मुलींनासुद्धा आर्मीमध्ये संधी उपलब्ध आहे. यशाचे उंच शिखर गाठायचे असेल तर मेहनतीशिवाय पर्याय नाही, असे मत मांडले.


शिक्षक अनंत मेंडाडकर यांनी आज स्पर्धा वाढली आहे. अशा वेळी तुमच्या जिद्द आणि चिकाटीला महत्त्व आहे, असे सांगितले. सलील अंतुले भाई यांनी विद्यार्थ्यांना अथक परिश्रमाचे महत्त्व पटवून देत यशाचे उंच शिखर कशा प्रकारे गाठता येईल याबद्दल सांगितले.

या वेळी अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले हायस्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज तसेच डॉ. ए.आर. उंद्रे हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज राजपुरीतील दहावी, बारावीतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शाळेचे शिक्षक वेदकुमार मुंढे यांनी मानले.

## मध्य रेल्वेकडून पहिल्या उन्नत सोलर प्लांटची स्थापना

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने कर्षण आवश्यकतांसाठी स्वच्छ आणि अक्षय ऊर्जा निवडण्यात नेहमीच सक्रिय भूमिका बजावली असून ती पूर्ण करण्यासाठी अनेक धाडसी आणि क्रांतिकारी पावले उचलली आहेत. मध्य रेल्वेने हाती घेतलेला आणखी एक वेगळा उपक्रम म्हणजे इगतपुरी तलावात १० एमडब्ल्यूपी क्षमतेचा फ्लोटिंग सोलर प्लांट बसवणे हा भारतीय रेल्वेवरील अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम असेल.



मध्य रेल्वेने २०३०पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाच्या अंतिम उद्दिष्टाकडे वाटचाल करीत रेल्वेस्थानके आणि इमारतींच्या छताचा वापर करून १२.०५ एमडब्ल्यूपी सौर संयंत्रे कार्यान्वित केली आहेत. त्यापैकी चार एमडब्ल्यूपी सौर संयंत्रे गेल्या वर्षी प्रदान करण्यात आली होती. (एमडब्ल्यूपी म्हणजे मेगा वॅट पीक जे पॉवरच्या कमाल संभाव्य उत्पादनाचे मोजमाप आहे).

यामुळे २०२३-२४मध्ये ४.६२ कोटी रुपयांची बचत झाली आहे आणि ६५९४.८१ मेट्रिक टन कार्बन फूटप्रिंटमध्ये बचत झाली आहे. चालू वर्षात अतिरिक्त ७ एमडब्ल्यूपी सोलर प्लांट बसवण्याची योजना आहे.अक्षय ऊर्जेकडे वाटचाल करण्यासाठीही पावले उचलण्यात आली आहेत. सध्या ५६.४ मेगावॅट पवन ऊर्जा आणि ६१ मेगावॅट सौरऊर्जा वापरण्यात येत आहे. पुढे ३२५ मेगावॅट सौर आणि पवन ऊर्जेच्या वापरासाठी पीपीएवर स्वाक्षरी करण्यात आली आहे, जी ‘राऊंड-द-क्लॉक’ तत्त्वावर असेल. याशिवाय चालू आर्थिक वर्षात १८० मेगावॅट सौरऊर्जा आणि ५० मेगावॅट पवनऊर्जाही वाहण्याची शक्यता आहे.

हे उपक्रम २,५०,००० झाडे वाचवण्याइतके आहेत म्हणजेच या उपाययोजनांद्वारे प्रदान केलेला लाभ २,५०,००० झाडांनी दिलेल्या फायद्याइतका आहे.

मध्य रेल्वेचा सध्याचा मासिक वीज वापर ट्रॅक्शन कामासाठी २३६.९२ दशलक्ष युनिट्स आणि नॉन-ट्रॅक्शन कामासाठी ९.७ दशलक्ष युनिट्स आहे. नूतनीकरणक्षम उर्जेचे वरील स्त्रोत कार्यान्वित झाल्यानंतर ७०% कर्षण ऊर्जा पर्यावरणपूरक होईल अशी अपेक्षा आहे.

# भारतीय क्रिकेट संघाने रचला इतिहास

## महिलांच्या कसोटीमध्ये ६०० धावसंख्या रचणारी पहिली टीम

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट संघादरम्यान चेन्नईमधील एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर एका सामन्याची कसोटी मालिका खेळवली जात आहे. या सामन्यात टीम इंडियाची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, ज्यामध्ये पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारतीय संघाची धावसंख्या ५२५ धावा होती. तर दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात टीम इंडियाने ६ गडी गमावून ६०३ धावांवर पहिला डाव घोषित केला. यासह भारतीय संघाने महिला कसोटी क्रिकेटच्या ९० वर्षांच्या इतिहासात प्रथमच मोठी कामगिरी केली आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाविरुद्धच्या कसोटीच्या पहिल्या डावात टीम इंडियाकडून उत्कृष्ट फलंदाजी पाहायला मिळाली, ज्यात शेफाली वर्माने कसोटीमधील पहिले द्विशतक झळकावले, तर उपकर्णधार स्मृती मानधानानेही शतकी कामगिरी केली. शेफालीने २०५ धावांची, तर स्मृतीने १४९ धावांची खेळी केली. याशिवाय जेमिमा रॉड्रीग्जने ५५ धावा, ऋचा घोषने ८६ धावा तर कर्णधार हरमनप्रीत कौरने ६९ धावांची उत्कृष्ट खेळी खेळली. भारताच्या सर्वच फलंदाजांनी शतक, अर्धशतक झळकावत ६०३ धावांचा मोठा डोंगर उभारला. यासह महिलांच्या कसोटीमध्ये इतकी मोठी धावसंख्या रचणारा भारत हा पहिला संघ ठरला आहे.




महिला कसोटी क्रिकेटच्या इतिहासात प्रथमच एखाद्या संघाने एका डावात ६०० धावा केल्या आहेत. त्याचबरोबर महिलांच्या कसोटी क्रिकेटमध्ये एका डावात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रमही भारताच्या नावावर नोंदवला गेला आहे. याआधी हा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाच्या नावावर होता, ज्यांनी २०२४मध्ये दक्षिण आफ्रिका संघाविरुद्ध पर्थ येथे झालेल्या कसोटी सामन्यात पहिल्या डावात ५७५ धावा केल्या होत्या.

६०० धावांच्या मोठ्या धावसंख्येसह भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वविक्रम केला. महिला कसोटी क्रिकेटची सुरुवात १९३४मध्ये झाली. एखाद्या संघाने ६०० धावांचा टप्पा ओलांडण्याची ९० वर्षांतील ही पहिलीच वेळ आहे.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात दुसऱ्या दिवसअखेर ४ बाद २३६ धावांपर्यंत मजल मारली. पाहुणा संघ अजूनही ३६७ धावांनी मागे आहे.

## इंझमामकडून आता सारवासारव

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा माजी कर्णधार इंझमाम-उल-हक याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ट्वेन्टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सामन्यात भारतीय गोलंदाजांवर अप्रत्यक्षपणे बॉल टॅम्परिंगचा आरोप केला होता. आता इंझमामने मला बॉल टॅम्परिंगचा आरोप करायचा नव्हता, अशी सारवासारव केली आहे.

इंझमामने भारताचा डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगवर टीका केली होती, ज्याने १६व्या षटकात चेंडू रिव्हर्स स्वींग केला आणि त्यावरून इंझमामने आरोप केला होता.

भारतीय कर्णधार रोहित शर्माने बॉल टॅम्परिंगचा दावे खोडून काढला आणि रिव्हर्स स्विंगचे श्रेय उष्ण व कोरड्या परिस्थितीला दिले. रिव्हर्स स्विंग केवळ भारतीय गोलंदाजांचाच होत नव्हता, तर सर्व संघांच्या गोलंदाजांचा होत होता आणि यावर रोहितने भर दिला. रोहित म्हणाला, कधीकधी लोकांना त्यांचे मन उघडून विचार करण्याची आवश्यकता आहे.

रोहितच्या विधानाने पाकिस्तानच्या माजी कर्णधाराला मिर्च्या झोंबल्या. इंझमामने स्पष्ट केले की, मी कधीही भारतावर बॉल टॅम्परिंगचा आरोप केला नाही. रिव्हर्स स्विंगच्या असामान्य वेळेमुळे चेंडूवर बारीक नजर ठेवण्यासाठी अम्पायर्सना सावध करणे हाच माझा हेतू होता.

## धोनीच्या नव्या हेअर स्टाइलने वेधले लक्ष

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीने भलेही क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असेल, पण त्याची खास शैली आणि लूक त्याला चर्चेत ठेवतात. आता एक अतिशय लोकप्रिय हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये माहीने त्याचे लांब केस कापलेले दिसत आहेत. ज्यामुळे धोनीला एक नवीन आणि मस्त लूक मिळाल्याचे दिसत आहे.

काही काळापूर्वी म्हणजे आयपीएल २०२४मध्ये धोनी लांब केसांच्या लूकमध्ये खेळताना दिसला होता, परंतु आता नवीन हेअरकटमुळे धोनी एखाद्या मॉडेलपेक्षा कमी दिसत नाही. हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने धोनीच्या फोटोसोबत कॅप्शनमध्ये लिहिले, आमचा तरुण, डायनॅमिक आणि देखणा महेंद्रसिंह धोनी. थालाचे हेअर स्टाईल करणे हा एक आनंददायी अनुभव आहे. धोनी नेहमीच इतका विनम्र असतो की, तो मला फोटो काढायला कधीच मनाई करीत नाही.

काही आठवड्यांपूर्वी धोनी रांची येथील त्याच्या फार्महाऊसमध्ये आराम करताना दिसला होता. त्या वेळी समोर आलेल्या फोटोंमध्येही धोनीचे केस लांब होते, मात्र आता त्याने केसांची लांबी थोडी कमी केली आहे. कमेंट सेक्शनमध्ये एका चाहत्याने लिहिले की, 'धोनी काही दिवसात ४३ वर्षांचा होईल यावर विश्वास बसत नाही. खरंतर धोनी अजूनही खूप तरुण दिसतो.'



दरम्यान, आयपीएल २०२४मध्ये धोनीच्या दमदार कामगिरीनंतर धोनी पुढच्या हंगामात खेळणार की नाही हे जाणून घेण्याची चाहत्यांना उत्सुकता असेल. नुकत्याच झालेल्या हंगामात त्याने सीएसकेचे कर्णधारपद ऋतुराज गायकवाडकडे सोपवले, जो संघाला प्लेऑफमध्ये नेऊ शकला नाही. या आयपीएलमध्ये धोनीने २२०च्या स्ट्राईक रेटने खेळताना १६१ धावा केल्या आणि भरपूर षटकार मारून प्रेक्षकांचे मनोरंजनही केले. धोनीने अद्याप निवृत्तीबाबत कोणतीही घोषणा केली नसल्यामुळे धोनी जर तंदुरुस्त राहिला तर तो आयपीएल २०२५मध्ये नक्कीच खेळताना दिसू शकतो.











पनवेल : भारतीय जनता पक्ष उलवे नोड २ आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वितरण करण्यात येत आहे. या अंतर्गत शुक्रवारी गव्हाण विभागातील शाळा-महाविद्यालयांमध्ये वह्यांचे वाटप करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना मोफत शालोपयोगी साहित्य वितरण करण्याचे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे तृतीय दशक चालू आहे. गव्हाण पंचक्रोशीत भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमांना स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शाळा-महाविद्यालयांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा समितीचे प्रतिनिधी, ग्रामस्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल शैक्षणिक संकुलांकडून आयोजकांचे आभार मानण्यात आले.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com